# Index



| Paper No. | Title | Author | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | महात्मा गांधीचे ग्रामीण विकासविषयक तत्वज्ञान | डॉ. अनिल ना. पाटील | 1-3 |
| 2 | महात्मा गांधीजी का तत्वज्ञान और भारत का स्वतंत्रता आंदोलन | प्रा.डॉ. जी.ए. शंभरकर | 4-6 |
| 3 | महात्मा गांधीची ग्रामविकासाची संकल्पना व दृष्टिकोन | प्रा. डॉ. संजय गोरे | 7-9 |
| 4 | ग्रामीण विकास आणि गांधीवादी विचारधारा | प्रा. डॉ. नंदाजी सातपूते | 10-12 |
| 5 | गांधी विचार - एक परिप्रेक्ष्य | प्रा. राजेश एस. डोंगरे | 13-15 |
| 6 | वर्ण, जाती व अस्पृश्यता निर्मूलण : महात्मा गांधीजींची भूमिका | प्रा. डॉ. व्ही.व्ही. लाडे | 16-21 |
| 7 | महात्मा गांधींचे शिक्षण विषयक विचार | डॉ. पी. बी. पगारे | 22-24 |
| 8 | महात्मा गांधी : सामाजिक न्याय की अवधारणा | नेमीचंद पालीवाल | 25-28 |
| 9 | असहकार आंदोलन :एक राष्ट्रव्यापी चळवळ | डॉ.भुषण रा.बंड | 29-32 |
| 10 | गांधीवाद आणि साम्यवाद : विश्लेषण आणि अभ्यास | प्रा. राजू पांडूरंगजी लिपटे | 33-35 |
| 11 | ग्रामीण विकास मी महात्मा गांधी के विचार : एक अध्ययन | डॉ.अनिल म.तिरकर | 36-41 |

ISSN No.2394-8426 with Impact Factor 3.325 | UGC Approved Journal Sr. No. 48455

# महात्मा गांधीचे ग्रामीण विकासविषक तत्वज्ञान

**डॉ. अनिल ना. पाटील**
ग्रामीण विकास विभाग प्रमुख
गोखले एज्युकेशन सोसायटीचे
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय
जव्हार जि. पालघर 401603
मो. 9422666366

**गोषवारा**

देशाला स्वांतत्र्य मिळून 70 पुर्ण झाले. देश विकासासाठी पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून ग्रामीण विकास विषयक अनेक प्रयत्न झाले. सामुदायिक विकास योजनेपासून डिजीटल इंडिया पर्यंतच्या अनेक योजना कार्यन्वयीत आल्या असे असतांना दारिद्रय, वाढती लोकसंख्या, निरक्षरता, अनैतिकता, सामाजिक उध्वपतन, वाढता भ्रष्टाचार, विसमता सामाजिक व आर्थिक संघर्ष, शेतक-यांच्या आत्महत्या, सार्वजनिक अस्वच्छता, अहिंसा, अनारोग्य, कुपोषण अशा समस्या ग्रामीण भागात कायम आहेत. विकासाच्या नावाखाली जागतिकीकरणाचा स्वीकार केला गेला. यातून नव्या प्रश्नांनी जन्म घेतला. याचे मुख्य कारण विकास प्रक्रियेत मनुष्य हा केंद्रस्थानी ठेवले गेले नाही. गांधीजींच्या विचारात तळागरळातील लोकांकडे लक्ष पुरविले आहे. महात्मा गांधीजींनी व्यक्ती स्वांतत्र्याला महत्व दिले. विकास प्रक्रियेत मनुष्य हा केंद्र स्थानी असावा असा गांधींजींचा नेहमी आग्रह होता. गाव स्वयंपुर्णत संदर्भात गांधीचा विचार महत्वाचा आहे. "ही पृथ्वी परमेश्वराची आहे. इथे राहणारे सर्व मानव एक आहेत. प्रत्येक गाव स्वर्यंपुर्ण आणि समानतेने सुखी व्हावे हे माझ्या स्वप्नातील रामराज्य!"

स्वातंत्र्या नंतर आधुनिकतेच्या नावाखाली गांधीच्या विचाराचा विसर पडल्यामुळेच समस्याचे स्वरुप अधिक उग्र होत आहे. प्रस्तुत शोध प्रबधात महात्मा गांधीचे ग्रामीण विकास विषयक तत्वज्ञान मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

**महत्वाच्या संकल्पना –** स्वदेश, ग्रामीण, विकास, प्रेम, सत्य, अहिंसा, अर्थव्यवस्था.

**प्रस्तावना –** विकास प्रक्रियेत ग्रामीण विकासाला महात्मा गांधीनी नेहमीच अग्रक्रम दिला आहे. खेडयाचा विकास झाल्या शिवाय देशाचा विकास होणे शक्य नाही. खेडयाचा ऱ्हास टाळायचा असेल तर तळाबाळातील लोकाकडे लक्ष पुरविणे गरजेचे आहे. सामाजिक उन्नती व्यक्तीगत उन्नतीमध्ये दडलेली असते यासाठी विकास प्रक्रियेत मनुष्य केंद्रस्थानी असावा. मानसामानसातील प्रेम, सेवाभाव, निती, श्रमाचे महत्व, आदरभाव, अहिंसा, समानता इ. मुल्यांना गांधी विचारात महत्वाचे स्थान आहे. खेडयांचे शोषण हा संघटित हिंसेचा प्रकार आहे. अहिंसाधिष्टीत स्वराज्य स्थापनेसाठी खेडयाना योग्य स्थान दयावे लागेल अशी महत्मा गांधीची धारण होती.

**संशोधनाची उद्दिष्टे –**

1) ग्रामीण विकास विषयक महात्मा गांधीच्या तत्वज्ञानाचे अध्ययन करणे.
2) सर्वांगींण विकास प्रक्रियेत गांधी विचाराचे महत्व अभ्यासणे.
3) सध्यस्थिती आणि गांधी विचार यांचा सहसंबध अभ्यासणे.

**महात्मा गांधीचे ग्रामीण विकास विषयक तत्वज्ञान :–**

21 व्या शतकात देशाची प्रगती घोडदौड अभिमानाने मांडताना ग्रामीण भागातील दुरावस्ता दुर्लक्षित करता येणार नाही. ग्रामीण पर्यावरणीय पर्यावरण प्रश्नांचे स्वरुप उग्र बनत आहे. शेतीची दुरावस्था दारिद्रयांचे विदारक चित्र, खालवलेल्या जीवन विषयक दर्जा, पाण्याची जिव्र टंचाई, अनारोग्य, कुपोषण अशा अनेक समस्यांची उत्तरे महात्मा गांधीच्या तत्वज्ञानात समावलेली आहे.

तथापि स्वातंत्र्या नंतर अनेक गांधीच्या अनुयायानी महात्मा गांधी व्यक्ती म्हणून स्वीकार केला असला तरी "गांधी हा एक विचार आहे" या विचाराचा स्वीकार सार्वत्रिक होण्याची गरज होती. गांधीचे विचार सदासर्वकाळ व कोणत्याही मानवाच्या कल्याणाला पोषक असेच आहेत. ग्रामीण विकासासंदर्भात गांधीचे विचार सुलभ, सहज आणि गरिबातल्या–गरिब कुटूबांचा विचार करणारे आहेत.

1. **गाव स्वयंपुर्णता:–**

महात्मा गांधीनी ग्रामीण भागातील प्राथमिक गरजांना महत्वाचे स्थान दिले होते. अशा गरजा खेडयातच पुर्ण होणे अपेक्षित आहे. गरजा पुर्ण करताना इतराची मदत होण्यास हरकत नाही. गावाच्या गरजेप्रमाणे धान्य उत्पादन आणि वस्त्रासाठी कापूस उत्पादन, गुरांना चरण्यासाठी जागा राखून ठेवणे आवश्यक आहे. शिक्षण पिण्याच्या पाण्यां?ची व्यवस्था, सभागृह अशा सर्व गोष्टी सुविधाबरोबरच गावात जातपात पाळली जाणार नाही अशी व्यवस्था निर्माण होणे आवश्यक आहे.

महात्मा गांधीचा गाव स्वयंपुर्णते संदर्भातील एक विचार महत्वाचा आहे. की हि पृथ्वी परमेश्वराची आहे. इथे राहणारे सर्व मानव एक आहेत. प्रत्येक गाव स्वयंपुर्ण आणि समानतेने सुखी व्हावे हे माझे स्वप्नातील स्वराज्य !"

प्रस्तुत विचारात ग्रामीण विकास प्रक्रियेसाठी महात्मा गांधी किती स्थान दिले आहे हे लक्षात येते.

ग्रामोद्योग आणि कुटीर उद्योगाच्या विकासा शिवाय ग्रामीण विकास अशक्य आहे. यासाठी गावतच रोजगार निर्मितीला महात्मा गांधीनी महत्वाचे स्थान दिले. गरीबी दूर करण्यासाठी चरख्याला महात्मा गांधीनी महत्वाचे स्थान दिले आहे. चरखा हे राष्ट्रच्या समृध्दीचे आणि स्वांतत्र्याचे प्रतिक आहे.

गाव स्वयंपुर्णतेसाठी हाताने दळणे, कांडणे,पाखडणे, साबण आणि कागद इ. निर्मिती कातडीकमावने, तेलघाणे चानविणे, इ. उद्योगाची गरज आहे. अशा वस्तुंची खरेदी हा भारतातीयानी धर्म मानावा असा मूलभूत विचार महात्मा गांधीनी मांडला.

**2.गाव व्यवस्था:–**

खेडयाच्या आरोग्यदायी रचने बाबत महात्मा गांधी आग्रही होते. उपलब्ध नैसगिक साधनाद्वारे झोपडया बांधल्या जाव्यात यात पुरेशे वास्तुविजन असावे घराचे भोवती परसबाग आणि गुऱ्हे बांधण्यासाठी जागा असावी गावात पिण्याच्या पाण्याच्या सुविधेसाठी विहिरी असाव्यात त्या सर्वाना खुल्या असाव्यात गाव व्यवस्थेत प्रार्थनागृह, सभागृह, शाळा, ग्रामपंचायत अशा व्यवस्था असने आवश्यक आहे.


Quarterly Journal Peer Reviewed Journal ISSN No. 2394-8426
Indexed Journal Referred Journal http://www.gurukuljournal.com/

**3. गावाची आरोग्य व्यवस्था** – गावातील सर्व लोकांना आरोग्यदायी जिवन लाभावे यासाठी महात्मी गांधी आग्रही होते. आजारानंतर उपचारापेक्षा, आजारा आगोदरच्या काळजीला महत्वाचे स्थान दिले आहे. स्वच्छता, स्वच्छ आणि शुध्द अन्न खाण्याच्या सवयी, आरोग्यदायी सुयोग्य जिवनक्रम लोकांना शिकविण्याबाबत महात्मा गांधी आग्रही होते. देशातील डॉक्टर आणि शास्त्रज्ञानी भारतातील खेडयाकडे लक्ष पुरवावे आणि पौर्वात्य पध्दतीने ग्रामिणांची परीचर्या करण्याची गरज त्यांनी मांडली.

**4. सार्वजनिक स्वच्छता** – सामुदायिक स्वच्छता आणि सार्वजनिक आरोग्याला महात्मा गांधीनी महत्वाचे स्थान दिले. या विषयाला शास्त्राची जाडे देण्याचा प्रयत्न केला. स्वच्छते बदद्लचे प्रेम व्यक्त करतांना त्यांनी गरीब, श्रीमंत अशा सर्वत्र लोकांनी या कामा योण्याची गरज व्यक्त केली. स्वच्छतेसाठी परावलंबन त्यांना मान्य नव्हते. शौचालय, घर, परिसर, स्वताः स्वच्छ करण्याचा कृतीपाठ त्यांनी समाजाला दिला. शौचालयाच्या पध्दती आणि मैल्याचे व्यवस्थापण यावर त्यांनी सातत्याने चिंतन केले.

**5. महात्मा गांधीचे शिक्षण विषयक विचार** – गांधीच्या शिक्षण व्यवस्थेत मेंदू बरोबर हाताला काम देण्याची महत्तव पुर्ण संकल्पना होती. शिक्षण म्हणजे बुध्दी, हृदय आणि आत्मा यांचा संगम होय. परिश्रमा बदद्ल तिरस्कार देणारे शिक्षण महात्मा गांधीना मान्य नव्हतं. भारताला शक्तीच्या आणि मोफत शिक्षणाची गरज त्यांनी मांडली. शिक्षणातुन मुलांच्या शारिरिक , मानसिक आणि अध्यात्मीक सुरतशक्तीचा विकास अपेक्षित आहे. पंचज्ञानेद्रियांच्या उपयोगाचे शिक्षण देउन त्याद्वारे बुध्दी विकासाला चालणा देणे महत्वाचे आहे. महात्मा गांधीनी आपल्या शिक्षक योजनेत अक्षर ओळखी पुर्वी अवजाराचं शिक्षण महत्वाचे मानले. शिक्षणात अर्थव्यस्थेचे महत्व मांडतांना त्यांनी बाजारात विकण्या योग्य वस्तु तयार करण्याची आग्रही भुमिका मांडली. गांधीच्या बुणियादी शिक्षण पद्धतीत हाताला काम, स्थानिक भाषेतील शिक्षण, सर्व कौशल्य आणि ज्ञान यांचे संघटन आणि एकमेकात बांधलेले असावेत यास महत्वाचे स्थान होते. स्त्रीशिक्षण बाबत महात्मा गांधीनी पुरुषाच्या सुविधे एवढेच महत्व स्त्रिशिक्षणास दिले होते. स्त्रीयांना गरज वाटेल तेथे विशेष सवलती दिल्या पाहिजेत. स्त्रीयांना सोडुन विकास म्हणजे देशाच्या 50 टक्के विकासाचा विचार असे गांधी मानत असत.

**6. व्यसन मुक्ती** – महात्मा गांधी दारुबंदीचे पुरस्करते होते. मेरे सपनोका भारत या पुस्तकात त्यांनी आपले विचार व्यक्त केले आहेत. या संदर्भाम ते असे म्हणतात ते असे म्हण्तात. मला केवळ एका तासाकरिता भारताचर हुकुमशहा बनविले तर सर्वप्रथम मी दारुची सर्व दुकाने, त्यांच्या मालकांना कोणतीही नुकसान भरपाई न देता बंद करण्यास लावेन तसेच कारखान्यांच्या मालकांवरही कर सवलतीने मजुरांच्या निर्वाहासाठी, माणसाला शोभेल अशी परिस्थिती उदाहरणार्थ, उत्साह आणि आरोग्य वर्धक खाद्य पदार्थ आणि पेये मिळू शकतील अशी उपहार गृहे, मनोरंजन गृहे आदिची निर्मिती करवुन देईन.

नशाबंदी जबरदस्तीने करण्यात येउ नये, दारु पिउु इच्छीनारांना त्याची मुभा मिळवयास हवी. या परवांगी तर्कशुध्द वाटणा–या विचारसरणीच्या भुलावणीला आम्ही बळी पडु नये याकरिता व्यसनांची सोय करुन देण्याची सरकारची मुळीच जबाबदारी नाही. कुंटरखाने चालविण्यास आम्ही संमती देत नसतो.

प्रस्तुत विचारात गांधीची दारुबंदी संदर्भातील आग्रही भुमिका लक्षात येते. विकासप्रक्रियेत व्यसनाधीनता हा मोठा अडथळा आहे. दारिद्रयात खितपत पडलेल्या लोकांना वर काढण्यासाठी दारुबंदी हा महत्वाचा घटक आहे. असे महात्मा गांधी सातत्याने वाटत असे.

**7. पशुधन** – ग्रामरचनेत महात्मा गांधीनी पशुधन विकासाला महत्वाचे स्थान दिले आहे. या संदर्भात ते म्हणतात, भारतातील अगणित पशुधनाकडे दुर्लक्ष करुन आम्ही पाप केले आहे. माझ्या मते माणसाच्या संपुर्ण विकासात गोरक्षणाचे स्थान अलौकिक आहे. गायीच्या निमित्ताने माणसाला संपुर्ण मुळया चेतन सृष्टीशी तादाम्याचा अनुभव घेता येईल. भारतात गाय हीच माणसाची सर्वश्रेष्ठ सहाय्यक होती. ती आमची एकमेव कामधेनु होती. ती निव्वळ दुध देत नसे तर ती आमच्या शेतीची आधारस्तंभ ही होती. तीचे रक्षण भारताने जगाला दिलेली अमोल देणगी आहे.

आदर्श खेडयांची रचना पुर्णतः अरोग्यदायी असावी. सर्व झोपडयातून भरपूर प्रकाश व हवा खेळावी. 5मैलाच्या परिघात प्रात्प साधनांच्या आधारे गावातील घरे बांधावीत. पुढे मागे अंगण असावे, म्हणजे गुरे बांधण्याची आणि स्वतःचा भाजीपाला प्रत्येकाला उगवण्याची सोय राहिल. वाटांवर धुळ नसावी, पुरेशा विहीर, त्या सर्वांना खुल्या असाव्यात. सर्वांसाठी प्रार्थना मंदिर, सभागृह असावे. गुरांच्या चराईसाठी जागा असावी, सहकारी पध्दतीची गोशाळा असावी आणि औद्योगिक शिक्षण प्रधान शाळा असावी. असा महत्वाचा विचार गांधीनी दिला.

7. स्वदेशी – स्वदेशी बद्दल गांधीजी नेहमी आग्रही होते. याचा अर्थ असा नव्हे की, विदेशीचा तिरस्कार होतो. कोणतीही वस्तू लक्षवधी लोकांचे कल्याण साधत असेल तर ती स्वदेशी होय मग तीचे भांडवल व ज्ञान परके असले तरी चालेल मग ते हिदी लाकांच्या हुकमानी खाली असले पाहिजे. असा गांधीजींचा आग्रह होता. सर्वांत उत्तम आणि स्वस्त असेल ती वस्तू घ्यावी हा नियम नेहमीच बरोबर ठरत नाही. स्वदेशी वस्तू टाकून विदेशी वस्तू पसंत करता तो द्रोह गांधी तत्वज्ञानाचा लोक चुकीचा अर्थ लावतात त्यांना तंत्रज्ञानाचा विराधक मानतात. परंतु Universalization हा शब्द प्रयोग त्यांचाच. गांधीवाद म्हणजे प्रमान तयार केलेली वस्तू

पान नंबर 10

असेल तर जास्त किंमत दिली पाहिजे. तंत्रज्ञानाने तयार केलेली वस्तू समाजाला स्वस्त मिळायला पाहिजे. श्रमाने तयार केलेले दुध महाग हवे आणि तंत्रज्ञानाने तयार केलेले ग्लास स्वस्त हवा. पण येथे दुधापेक्षा पाणी महाग झाले आहे.

1. अर्थशास्त्रीय विचार – महात्मा गांधींच्या अर्थशास्त्रीय विचाराला नितीशास्त्राची जोड देण्यात आली आहेत्र खरे अर्थशास्त्र सामाजिक न्यायाचा पाठपुरावा करते. जो जो संपत्तीचा संचय अधिक होतो तो तो निती भ्रट्रता वाढते. एका राष्ट्राने दुस राष्ट्राला लुबाडावे हे ज्या अर्थशास्त्रात संमत आहे त्या अर्थशास्त्राला गांधींनी अनैतिक मानले आहे. म्हणूनच गांधींनी शिक्षणा बरोबर श्रमालाही प्रतिष्ठा दिली आहे. श्रमजीवनाने मुलाच्या शारीरिक, बौधिक व नैतिक विकास होतो हे शिक्षण पध्दतीच वैशिष्टय आहे.

   ग्रामपातळीवरील स्वयंपुर्णतेच्या गांधीजींनी स्वीकार केला आहे. या साठी खेडे हे आर्थिक विकासाच्या प्रक्रियेचे उत्तम व आदर्श प्रतिमान त्यांनी मानले आहे.

2. गांधीच रचनात्मक कार्यक्रमाचा स्विकार – पारतंत्र्याची समाप्ती हे गांधीचे साध्य नव्हते, गांधीनी आपल्या मृत्यू पत्रात असा उल्लेख केला आहे कि, सामाजिक, नैतिक, आर्थिक स्वातंत्र्याची सात लाख गावाची (पाकिस्तानसह) कामगिरी बाकी आहे. ग्रामोध्दाराचा सांक विचार करतांना अर्थरचना, शिक्षण पध्दती,स्त्रीया आणि मुलांच्या विकसाचे कार्यक्रम, हरिजन आणि दुर्बलांच्या उध्दाराचे प्रयान, सर्वधर्म समानता आणि जाती बंधनाचा त्याग यांचा विचार केला आहे. महात्मा गांधींनी अठरा रचनात्मक कार्यक्रम सुचविले आहेत.

1. सांप्रदायिक ऐक्य 2. अस्पृश्यता निवारण 3. दारुबंदी 4. खादी 5. अन्यग्रामोद्योग 6. ग्राम सफाई 7. मुलोद्योग शिक्षण 8. साक्षरता प्रसार 9. महिला सक्षमीकरण 10. आराग्य शिक्षण 11. प्रादेशिक भाषा 12. राष्ट्रभाषा 13. आर्थिक समता 14. शेतकरी 15. कामगार 16. आदिवासी 17. कुष्टरोग सेवा 18. विद्यार्थी

तत्कालीन कालखंडात प्रस्तूत कार्यक्रम तंतोतंत लागू होते. 70 वर्षा नंतरचे काही प्रश्न अधिक गंभीर झाले आहे. उदा. पर्यावरण (ग्लोबल वार्मिंग) आर्थिक विषमता, मानविय शोषण, आजच्या प्रश्नाची देखिल उत्तरे गांधी विचारात दिलेली आहे. महात्मा गांधीच्या तत्वज्ञानान ग्रामीण विकासाचे मुळ आहे असे म्हणने गैर ठरु नये.

निष्कर्ष :– महात्मा गांधीचे तत्वज्ञान ग्रामीण विकासासाठी महत्वपुर्ण आहे. गांधी विचाराचा स्वीकार न केल्याचे परिणाम आजही जाणवतात. गांधी विचार केवळ भारताला नाही तर जगाला लागू होतात. महात्मा गांधी तत्वज्ञान जगाला शांततेकडे नेणारे, मानवी संपत्तीचे जतन व भरभराट समृध्द करणारे तत्वज्ञान आहे. प्रस्तुत तत्वज्ञानाची आज आपणास गरज आहे.

गांधी तत्वज्ञानात नेहमी ग्रामीण भागाला अग्रस्थान होते. खेडयाचा विकास शिवाय देशाचा विकास शक्य नाही. अशी महात्मा गांधीची धारणा होती.

तत्वाशिवाय – राजकारण
कामाशिवाय – संपत्ती
चारित्र्याशिवाय – ज्ञान
मानुसकीशिवाय – विज्ञान
प्रामाणिकते शिवाय – व्यापार

महात्मा गांधीना मान्य नव्हते सध्यस्थितीचा विचार करता प्रस्तुत तत्वज्ञान लागू पडते. यासाठी कोणते दाखले देण्याची गरज नाही. आज गांधी तत्वज्ञान तेवढेच महत्वाचे आहे.

**संदर्भ ग्रंथ**

1. महात्मा गांधी :– माझ्या स्वप्नांचा भारत – परंधाम प्रकाशन वर्धा(1969)
2. महात्मा गांधी :– हिंद स्वराज्य – परंधाम प्रकाशन पवनार वर्धा –1990
3. प्रा. श्री. बा. पंडीत :– गांधीजी एक व्यक्ती की विची – श्री. अक्षर ग्रंथ प्रकाशन मुबंई 2011
4. वासंती सोर :– एकविसाव्य शतकात गांधी – परंधाम प्रकाशन पवनार – 2010
5. प्रा. चंद्रकांत पाटगावकर :– महात्मा गांधी प्रणीत आकराव्रते – 5005
6. वंसत पळशीकर :– वेणू पळशीकर : बुनियादी शिक्षणाची मुलतत्वे : विनोबा विचार केंद्र 1998
7. प्राचार्य डॉ. सोमनाथ रोडे– महात्मा गांधी आणि जागतिकीकरण – अश्विनी प्रकाशन लातुर 2013
8. प्रा. विराग गवांदे :– डॉ. संजय कोठारी – गांधी विचारी – आंतरराष्ट्रीय संसोधन खंड – आधार पब्लीकेशन अमरावती 2012

***ISSN No.2394-8426 with Impact Factor 3.325 | UGC Approved Journal Sr. No. 48455***

# महात्मा गांधीजी का तत्वज्ञान और भारत का स्वतंत्रता आंदोलन

प्रा.डॉ. जी.ए. शंभरकर
जनता महाविद्यालय, चंद्रपूर
मो.नं. 9890868307

- **प्रस्तावना :**

राष्ट्रपिता महात्मा गांधीजी का जन्म 2 ऑक्टोंबर 1869 को गुजरात राज्य के पोरबंदर शहर मे हुआ। उनके पिताजी पोरबंदर तथा राजकोट यहा पर दिवाण थे। उनकी माताजी धार्मिक प्रवृत्ती की थी। यही संस्कार महात्मा गांधीजी पर भी हुये। गांधीजी की प्राथमीक शिक्षा राजकोट मे हुयी। 1887 मे दसवी की परीक्षा पास होने के पश्चात उनके भाई ने उच्च शिक्षा के लिये इंग्लंड भेज दिया। वहा से बॅरिस्टर की पदवी प्राप्त कर 1891 मे भारत लौटे। महात्मा गांधी ने सबसे पहिले राजकोट मे वकिली शुरू की। तत्पश्चात वह 1893 मे मुंबई मे स्थलांतरित हुये। अप्रेल 1893 मे एक हिंदी कंपनी के वकिल के रूप में दक्षिण आफ्रिका गये। दक्षिण आफ्रिका की सफलता के बाद 9 जानवरी 1895 मे महात्मा गांधीजी वापस भारत पधारे। उनके राजकीय गुरू उनके बारे मे कहते है की, "पराक्रमी विर पुरूष तथा महान व्यक्ती के सानिध्य मे तयार हुआ व्यक्तीमत्व याने महात्मा गांधी।" महात्मा गांधीजी भारत मे वापस आये तब युरोप मे प्रथम विश्वयुध्द शुरू हो चुका था। इंग्लंड को इस युध्द मे संपुर्ण सहकार्य करने की भूमिका गांधीजी ने ली थी। लेकिन 1917 मे बिहार मे चंपारण्य जिल्हे मे युरोपियन लोगो ने जो अत्याचार वहा काम करनेवालो श्रमीको पर किया, उसके विरोध में गांधीजी ने सत्याग्रह के माध्यम से लडाई लडी। 1918 मे गुजरात राज्य मे खेडा इस जिल्हे के किसानो के प्रश्न पर सत्याग्रह किया। इन दो सत्याग्रह के कारण उनको देशभर मे प्रसिध्दी मिली।

- **सारांश :**

प्रथम विश्व युध्द समाप्ती के पश्चात अंग्रेज सरकार ने स्विकृत निती के कारण गांधीजी का सरकार के बारे मे भ्रमनिराश हुआ। रौलट कानुन, जालियनवाला बाग हत्याकांड, देश के कुछ हिस्सो मे सरकार की बेबंदशाही, भारतीय जनता के मॉगो की तरफ मुह फेरना आदि घटनाओ के कारण गांधीजीने सरकार के विरोध मे भारतीय जनता मे जागृती निर्माण करना और लोगो को संघटित करने का कार्य हाथ मे लिया। जिसके कारण 1920 के दशक मे भारतीय राष्ट्रीय आंदोलन का नेतृत्व अपने आप गांधीजी के तरफ आया। सन 1920 मे गांधीजीने अंग्रेज सरकार के विरोध मे असहकांर आंदोलन शुरू किया। तबसे भारतीय राष्ट्रीय आंदोलन गांधीजी के नाम जुडा। भारत का सर्वश्रेष्ठ नेता के रूप मे गांधीजी के तरफ देखा जाने लगा। सन 1930 मे सविनय कानुन भंग तथा 1942 मे भारत छोडो अथवा चले जाव आंदोलन इस स्वतंत्रता आंदोलन मे दो बडे आंदोलन का नेतृत्व गांधीजी ने किया। सन 1920 तथा 1947 तक भारत का स्वतंत्रता आंदोलन गांधीजी के नेतृत्व मे ही लडा गया था। उस समय गांधीजी यह भारतीय राष्ट्रीय आंदोलन तथा राष्ट्रीय एकता का प्रतिक बन गये थे। उनके एक इशारे पर हजारो देशभक्त देश के लिये अपने प्राणों की बाजी लगा देते थे। इसलिये भारतीय स्वतंत्रता आंदोलन का वह पुरा गांधीयुग कहलाता था। गांधीजी ने ग्यारह व्रत का स्विकार किया था। वह निम्नलिखित है। अहिंसा, सत्य अस्तेय, ब्रम्हचर्य, अपरिग्रह, शरीरश्रम, आस्वाद, निर्भयता, सर्वधर्म समभाव, स्वदेशी, अस्पृश्यता, निर्भयता इस तत्वों को गांधीजी आधारभूत मानत थे। उनके मतानुसार निर्भयता के कारण अन्य तत्वों का पालन कर सकते है। महात्मा गांधीजी के राजकिय तत्व मे सत्य तथा अहिंसा इन तत्वो को महत्वपूर्ण स्थान है। यह तत्व भारत के लोगो के तत्वो को महत्वपूर्ण स्थान है। यह तत्व भारत के लोगो के लीये नये नही थे।इन तत्वो का इसके पहिले भी भारत के अनेक श्रेष्ठ पुरूषो ने, साधुसंतोने, सत्य और अहिंसा का पुरस्कार किया। प्रस्तुत शोध निबंध मे भारतीय स्वांतत्रता आंदोलन मे महात्मा गांधीजी के तत्वज्ञानपर प्रकाश डाला गया है।

- **बिजशब्द :–**

सत्य, अहिंसा, असहयोग, नकारात्मक, सकारात्मक, सविनय, नमक सत्याग्रह, चलो जाव, राष्ट्रीय कॉग्रेस

- **महात्मा गांधीजी का तत्वज्ञान तथा भारतीय स्वतंत्रता आंदोलन :**

भारतीय स्वतंत्रता आंदोलन मे गांधीजी का स्थान अत्यंत महत्वपूर्ण है। 20 वी सदी के दुसरे दशक मे गांधीजी ने सत्याग्रह की शुरूवात कर एक नयी विचारधारा शुरू की। सत्याग्रहो को उन्होने सत्य, अहिंसा और असहयोग का जिवन तत्व प्रदान किया। ब्रिटिश सत्ता के अन्यायो का प्रतिकार करने के लिये इन तिन तत्वों के माध्यम से प्रतिकार किया जा सकता है और इस विचारधारा का उपयोग गांधीजी ने भारतीय स्वतंत्रता आंदोलन के लिये किया। निशस्त्र भारतीय जनता को एक नया शस्त्र प्रदान किया। बॅरिस्टर के पदवी के पश्चात 1893 मे गांधीजी पोरबंदर की मेमन फर्म कंपनी के एक केस के सिलसिले मे दक्षिण आफ्रिका गये। वहा के कृष्णवर्णीय तथा भारतीय लोगो को न्याय देने के लिये 22 मइ 1894 मे नाताळ इंडियन कांग्रेस की स्थापना की। गांधीजीने भारतीय लोगो को अधिकार प्राप्ती के लिये सत्याग्रह शुरू किया। गांधीजी के अहिंसात्मक सत्याग्रह को यह मिली हुयी पहली सफलता थी। 1915–16 तथा 1917 मे बिहार के चंपारण्य जिल्हे मे तथा गुजरात के खेडा जिल्हे मे सत्याग्रह के माध्यम से श्रमिको पर होने वाले अन्याय दुर किये। इसके कारण ब्रिटीश सरकार ने अग्रेरियन ॲक्ट पास कर श्रमिको पर होनेवाला अन्याय दुर किया। यह गांधीजी की दुसरी सफलता थी।

- **असहयोग आंदोलन :**

सप्टेंबर 1920 मे कलकता मे हुये भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस के अधिवेशन मे असहयोग आंदोलन को मान्यता प्राप्त हुयी। कलकत्ता अधिवेशन मे गांधीजी ने असहयोग आंदोलन का ऐतिहासिक प्रस्ताव मान्य किया। 31 दिसंबर 1920 को नागपूर मे भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस का अधिवेशन हुआ। उस अधिवेशन मे 14582 प्रतिनिधी उपस्थिती थे। असहयोग आंदोलन के नकारात्मक तथा सकारात्मक ऐसे दो भाग किये गये। पंडित नेहरू कहते है की 1921 यह वर्ष अनन्य साधारण तथा महत्वपूर्ण वर्ष है। गांधीजी के नेतृत्व मे भारत मे पहली बार विदेशी सत्ता के विरूध्द प्रतिकार असहयोग आंदोलन के माध्यम से किया गया।

- **सविनय कानुन भंग आंदोलन :**

14 फरवरी से 16 फरवरी इन तीन दिन मे साबरमती आश्रम मे भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस के कार्यकारीणी की सभा हुयी। उसमे सविनय कानुन भंग आंदोलन शुरू करने का गांधीजी ने ऐलान किया। यंग इंडिया इस समाचार पत्र मे लेख लिखकर अपनी निम्न ग्यारह मांगे ब्रिटीश सरकार के सामने रखी।

1) संपूर्ण भारत मे ब्रिटिश शासन दारूबंदी करे।
2) जमीन महसूल वसूली आधी कि जाये।
3) नमक का कर पूरी तरह समाप्त किया जाये।
4) परदेशी कपडो पर भारत मे कर लगाया जाये।
5) सभी राजकीय कैदी को मुक्त किया जाये।

यदी यह मांग पूरी होती है तो सविनय कानून भंग आंदोलन शुरू नही करेंगे और गोलमेज परिषद मे हिस्सा लेंगे। लेकिन सरकार ने यह मांगे पूरी नही की । इसलिये गांधीजी ने सविनय कानून भंग आंदोलन जारी रखा।

- **दांडी यात्रा तथा नमक सत्याग्रह :**

ब्रिटिशो ने भारतीय लोगो के नित्य उपयोग मे आनेवाले नमक पर बडा कर लगाया। इसलिये महात्मा गांधी ने इस अन्याय पूर्ण कर के विरोध मे साबरमती आश्रम मे नमक कानून को कानुन से तोडने के लिये सविनय कानुन भंग आंदोलन की शुरूवात की जायेगी। महात्मा गांधीजी ने सविनय कानुन भंग कार्यक्रम भारतीय जनता को समझाकर बताया। गांधीजी ने साबरमती आश्रम से 241 किलोमिटर दुर सुरत मे स्थित दांडी का समंदर किनारा प्रसिध्द था उसका चयन किया। 12 मार्च 1930 को गांधीजी ने 79 स्वंयमसेवको के साथ दांडी यात्रा की शुरूवात की। रोज 10 से 12 किलोमिटर अंतर पैदल चलकर 25 दिनो मे 5 अप्रिल 1930 को दांडी यहा पहुंचे। गांधीजीने दांडी समंदर किनारे का नमक उठाकर ब्रिटिश कानुन का उल्लंघन किया। गांधीजी के साथ के स्वयंसेवको ने भी नमक उठाकर उनका साथ दिया। इस कारण सविनय कानुन भंग आंदोलन की शुरूवात हुयी। जगह–जगह पर नमक तयार करके नमक कानुन तोडा गया।

सविनय कानुन भंग आंदोलन का जोर बदला गया। इस कारण ब्रिटिश शासन की चिंता बढती गयी। व्हॉईसराय आयर्बिन तथा महात्मा गांधीजी के साथ 5 मार्च 1930 को अनुबंध किया। उसके अनुसार

1) गांव पर लगाया गया दंड माफ होगा।
2) कुछ गाव को नमक तयार करने की अनुमती दी।
3) विदेशी कपडा, दारू तथा अफु की दुकान के सामन शांतीपूर्वक सत्याग्रह करने की अनुमती दी।
4) जिन सत्याग्रहो की संपत्ती आंदोलन काल मे जप्त की वह उन्हे वापस दि गयी।

- **भारत छोडो अथवा चले जाव आंदोलन :**

इ.स. 1942 मे भारत छोडो आंदोलन यह भारतीय स्वतंत्रता संघर्ष का महत्वपूर्ण तथा परिवर्तनवादी आंदोलन था। दुसरे महायुध्द की शुरूवात होने के पश्चात इंग्लंड कठिनाईया मे आ गया था। 1942 मे इंग्लंड संसद मे विन्स्टन चर्चिल इन्होने भारत की न्यायपूर्ण मॉग के संबंध मे चर्चा करने के लिये सर स्टॅफोर्ड क्रिप्स इनके नेतृत्व मे 22 मार्च 1942 को एक प्रतिनिधी मंडल भारत मे भेजा। महात्मा गांधीजी ने कहा ब्रिटिशों का भारत छोडकर जाने का समय आ गया है। इंग्लंड ने भारत से अपने सभी संबंध छोडकर जाना चाहिये। 14 जुलै 1942 मे वर्धा इस शहर मे भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस पार्टी की सभा आयोजित की गयी। तथा इस सभा मे भारत छोडो आंदोलन का ठराव पारीत किया गया। राष्ट्रीय कॉग्रेस के खुले अधिवेशन मे ठराव पारीत करने के लिये 7 अगस्त 1942 को मुंबई के गवालीया टॅक यहा प्रस्ताव रखा गया। 8 अगस्त रात के ग्यारह बजे चले जाव आंदोलन का प्रस्ताव प्रचंड मतो से पारीत किया गया। उसके अनुसार

1) भारत यह इंग्लंड के गुलामगिरी मे नही रहेगा।
2) भारत की स्वतंत्रता यह एशिया तथा अफ्रीका जैसे राष्ट्र जो मुक्त नही है। ऐसे राष्ट्रो के लिये प्रेरणा दायक रहेगा।
3) भारत को स्वंतत्रता मिले यह भारत को आवश्यकता नही बल्की नाझीझम, फॅशीझम और साम्राज्यवादी प्रवृत्ती को रोखना इसके लिये स्वतंत्रता जरूरी है।
4) यह सब घटित होने के लिये ब्रिटिशो ने भारत मे से अपनी सत्ता छोडनी चाहिये। ऐसी मॉग राष्ट्रीय सभा इस प्रस्ताव मे कर रही है।
5) यह संघर्ष शांती के मार्ग से चलाया जायेगा। तथा इस आंदोलन का नेतृत्व गांधीजी के तरफ रहेगा।

महात्मा गांधीजी ने भारतीय जनता को संबोधीत करते हुये 'करो अथवा मरो' यह संदेश दिया। यह आंदोलन अहिंसा के तत्व पर तथा सत्याग्रह पर आधारित और बहिष्कार का होगा ऐसा घोषित किया गया। 8 अगस्त मध्य रात को गांधीजी समेत सभी नेतओं को गिरफ्तार किया गया और उन्हे खास रेल से मुंबई से दुर ले जाया गया। 9 आगस्त को मुंबई की सभी टेलिफोन सेवाये बंद कर दि गयी। 9 अगस्त को भारतीय जनताने खुद होकर आंदोलन चलाया। महात्मा गांधीजी को गिरफ्तार कर पुणे के आगाखान पॅलेस मे रखा गया। मध्यप्रांत मे चिमुर आष्टी तथा यावली यहा पर जनता ने अभुतपूर्व संघर्ष किया।

- **निष्कर्ष :**

भारत के स्वतंत्रता आंदोलन मे असहयोग, सविनय कानुन भंग, दांडीयात्रा चलो जाव आंदोलन को अत्याधिक महत्व है। महात्मा गांधीजी के नेतृत्व सही मायने मे असहयोग आंदोलन के कारण मोहर लगी। गांधीजी यह आंदोलन जनमानस तक पहुचाने मे सफल हुये। इसी समय संपूर्ण भारतीय जनता को राजकीय अस्मिता की पहचान हुयी। गांधीजी के प्रत्येक आंदोलन के साथ जनता निर्भय होती गयी। जनता को ब्रिटिश

साम्राज्यवाद पुलिस जेल इसमे से कीसी भी प्रकार का डर नही रहा। इसके अलावा निशस्त्र प्रतीकार का मार्ग तथा सत्याग्रह इस तंत्र की शक्ती का एहसास भारतीय जनता को हुआ। गांधीजी का भारत स्वतंत्रता आंदोलन सत्य और अहिंसा इस तत्वज्ञान पर निर्भर था। आज ऐसा लगता है की, भारत के स्वतंत्रता के पश्चात भी गांधीजी के अहिंसा तत्वज्ञान की कितनी जरूरत है। आज युध्द की नही गांधीजी के विचारोंकी पूरे विश्व को आवश्यकता है।

- **संदर्भग्रंथ सुचि :–**

1. लोटे रा.ज., भारतीय राजकीय विचार, पिंपळापूरे पब्लीकेशन, नागपूर, 2014
2. कुलकर्णी बी.वाय, राज्यशास्त्र, विद्याभारती प्रकाशन, नागपूर, 2004
3. बोस निर्मिलकुमार, सिलेक्शन फाम गांधी, नवजीवन पब्लीकेशन, अहमदाबाद, 1948.
4. बिपीनचंद्र, आधुनिक भारत का इतिहास, ओरीएंटल ब्लॉकशाप, नई दिल्ली, प्र.आ. 2009
5. मिश्रा डी.पी., मध्यप्रदेश मे स्वतंत्रता आंदोलन का इतिहास, गव्हर्मेंट प्रेस, नागपूर, प्र.आ., 1956
6. देसाई ए.आर., भारतीय राष्ट्रवाद की सामाजिक पृष्ठभूमी, मॅकमिलन ॲन्ड कंपनी, नई दिल्ली, प्र.आ., 1976
7. शर्मा जे.पी., मध्यप्रदेश के राष्ट्रीय आंदोलन, दुर्गा प्रकाशन, नई दिल्ली, प्र.आ., 1989
8. गोपाल रॉय, भारतीय स्वतंत्रता संघर्ष का इतिहास, सूचना एवमं प्रसारण मंत्रालय, नई दिल्ली, प्र.आ. 1974

# महात्मा गांधीची ग्रामविकासाची संकल्पना व दृष्टिकोन

**प्रा. डॉ. संजय गोरे**
राज्यशास्त्र विभाग प्रमूख व संशोधक मार्गदर्शक
शरदराव पवार महाविद्यालय, गडचांदूर जि. चंद्रपूर

**सारांश** :–

भारतीय खेडी अनेक समस्यांच्या सामना करत होती. बेरोजगारी, अस्पृश्यता, निरक्षरता, रोगराई यासारख्या समस्यांतून भारतीय खेडयांना वाचविण्यासाठी गांधीनी प्रयत्न करण्याचे ठरविले. पूर्वी भारताला जगामध्ये जे गौरवाचे स्थान होते ते आज राहिलेले नाही. महात्मा गांधी म्हणत असत की, भारताला पूर्वीसारखे गौरवाचे स्थान पुन्हा निर्माण करता येऊ शकते. कारण भारतीय खेडयांच्या पुनर्रचनेसंदर्भात गांधीजी आशावादी होते.

सामाजिक जीवनाच्या सर्व क्षेत्रांना लागू करण्यासाठी तसेच त्यांना अभिप्रेत असलेल्या समाज निर्मितीसाठी गांधीजींनी जीवनाच्या शेवटच्या श्वासापर्यत अविश्रांत धडपड केली. ग्रामविकाससंदर्भात त्यांची स्पष्ट भूमिका होती. ग्रामस्वराज्याशिवाय अर्थात ग्राम –विकासाशिवाय खऱ्या अर्थाने स्वराज्याला व लोकशाहीला मूर्तस्वरूप येणार नाही.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर इ. स. 1951 च्या राष्ट्रीय जनगणनेचा विचार केल्यास ग्रामीण भागातील लोकसंख्येचे प्रमाण 82.7 टक्के होते. ते इ. स. 2001 च्या जणगनणेशी पडताळून पाहिले असता ग्रामीण भागातील लोकसंख्येचे प्रमाण 72.2 टक्के असल्याचे आढळते. ग्रामीण भागात अन्न, वस्त्र, निवारा, पाणी, शिक्षण, आरोग्य इ. मुलभूत गरजांची पूर्तता करणेही अवघड होत आहे. अशातच पावसाच्या लहरीपणावर अवलंबून असलेली शेती, ग्रामीण उद्योजकतेचा अभाव, शेती क्षेत्रात अन्नधान्यांची जाणवणारी टंचाई, पाळीव प्राण्यांच्या पालनपोषणांचा वाढता खर्च, शेतकऱ्यांवरील वाढता कर्जाचा बोजा व त्यातून उद्भवणाऱ्या वाढत्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या, शेतीमालाच्या किमतीविषयी शासनाची उदासिन भूमिका, पाणी व विजेची कमतरता असते.

ग्रामीण विकाससंदर्भात गांधीजींचा दृष्टिकोन अभ्यासतांना महात्मा गांधी एक व्यक्ती यापेक्षा महात्मा गांधी म्हणजे एक विचार व जगण्याचा दृष्टिकोन म्हणून पाहता येईल. गांधीजीवर जॉन रस्किन च्या विचारांचा प्रभाव होता. म्हणून त्यांनी श्रमिक व कामगाराना महत्व दिल्याचे आढळते. गांधीच्या ग्रामविकासाच्या विचाराला ग्रामस्वराज्याचा विचार म्हणून ओळखले जाते. गांधीजींना ग्रामस्वराज्यात खेडयांची समस्यांतून मूक्तता करून ग्रामजीवनात नवचैतन्य निर्माण करणे असे अपेक्षित होते.

**प्रस्तावना** :–

खेडेगावच्या समग्र विकासाचा विचार मांडतांना अनेक गोंष्टीबाबत तपशीलवार व कालदर्शी विचार गांधीजींनी व्यक्त केले होते. गांधीना अपेक्षित असलेले ग्राम हे गणराज्याप्रमाणेच होते. खेडयातील लोकांना गावांबाबत निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य असले पाहिजे. तसेच पंचायतीला गावातील तंटे मिटविणे व न्याय देणे याबाबत अधिकार असावेत.

गांधींच्या मते, व्यक्तिगत स्वच्छतेच्या बाबतीत भारतीय लोक अग्रभागी असतात. परंतू सार्वजनिक स्वच्छतेच्या बाबतीत असे घडत नाही. खेडयातील लोक शौचासाठी रस्त्याच्या कडेलाच बसतात.

त्यामुळे गावाच्या बाजूने दुर्गंधी पसरते. शारीरिक स्वच्छता आरोग्यासाठी आवश्यक असते. ग्रामसफाईचा आरोग्य रक्षणाच्या दृष्टिकोनातून विचार केल्यास खेडयातील प्रत्येक व्यक्तीला व कर्मचाऱ्याला आरोग्य रक्षणाचे ज्ञान असले पाहिजे.

भांडवलशाही ही देशाला मारक आहे. ते भांडवलदारांच्या विरूध्द होते. कारण भांडवलदार श्रमिकांचे शोषण करतील. भांडवलदार श्रमिकांच्या घामाचा लचका तोडतो व तो मोठा होतो. त्यामुळे आर्थिक विषमता वृध्दिगत होते. म्हणून त्यांना देशात लोकशाही समाजवाद हवा होता.

खेंडयांमध्ये सहकारी तत्वावर शेती केली तर एकात्मतेची भावना निर्माण होवून 'एकमेका सहाय्य करू अवघे धरू सुपंथ' या म्हणीप्रमाणे जो शेतकरी गरीब आहे, ज्याज्याकडे शेती कसण्याचे साधन नाही, त्याला मदत होईल व सहकार्यमय वातावरण खेडयात निर्माण होईल. असे त्यांचे मत होते. सहकारी शेतीमुळे देशात सहकार वृध्दिगत होण्यास मदत होईल, असे त्यांचे मत होते. 'विनासहकार नही उध्दार' असे त्यांचे मत होते.

यांत्रिकीकरणाच्या संदर्भात गांधीजींचे विचार समजून घेण्याची आवश्यकता आहे. गांधीजींच्या मते यांत्रिकीकरण म्हणजे लाखो लोकांची बेकारी. म्हणजेच मानवतेच्या दृष्टिने घोर अपराध होय. गांधीजींच्या मते गरीब व श्रीमंत यामधील फरकाला पाश्चात्यांची मोठया प्रमाणावरील यांत्रिकी उत्पादन पध्दती जबाबदार आहे.

**महात्मा गांधीजींची ग्रामविकासासंबंधी संकल्पना** :– महात्मा गांधींनी सत्यास साध्य मानले तर अहिंसा हे सत्य प्राप्त करण्याचे एकमात्र साधन आहे असे म्हणतात. अहिंसेशिवाय सत्य साध्य करणे शक्यच नाही. हिंसा, व्देष, यातून प्रतिहिंसा, संघर्ष, आणि वैमनस्यांची निर्मिती होते. तर अहिंसेमुळे प्रेम, सहयोग, सद्भावना, परस्पर सहकार्य, बंधुभाव आणि समन्वयाची भावना वृध्दिगत होते.

म. गांधीजींच्या शब्दात मांडायचे म्हणजे उत्पादन, उपयोग, विभाजन, या क्रिया जवळजवळ समन्वातूनच चालतात आणि द्रव्य अभिलाषी अर्थशास्त्रामुळेच जी दृष्टि परंपरा ओढवते तिचे नावही त्यावेळी ऐकू येत नव्हते. एखादया वस्तूला कधीकाळी बाजारभाव चांगला येईल या उददेशाने त्या वस्तूचे उत्पादन कधीच केले जात नसे. उत्पादनात तत्कालीन व आवश्यक त्या गरजा भागविण्याचा उददेश असतो.

श्रमास प्रतिष्ठा प्राप्त करून देण्यासाठी गांधींनी पुढाकार घेतला. शेतकरी अन्न पिकवितो, म्हणून तो या समाजाचा सर्वात प्रमुख घटक आहे. शेतकऱ्यांच्या प्रतिष्ठेचा प्रश्न हा गांधींना सर्वात महत्वाचा वाटतो. त्यांच्या श्रमातून मिळणाऱ्या पैशाचा दुरूपयोग होवू नये यासाठी गांधीजी आग्रह धरतात.

भारतातील ग्रामीण भाग हा स्वंयपूर्ण झाला पाहिजे रामराज्याच्या व्यवस्थेतील ग्रामीण भारत हे स्वंयपूर्ण होते. प्रत्येक गावात गरजेनूसार उत्पादन आणि मागेल त्यास काम मिळत असे. प्रत्येक वर्ग आपआपल्या क्षेत्रात उत्पादन करून गावास स्वंयपूर्ण बनवत असे. आज ग्रामीण भाग ओसाड होत असल्याचे चित्र दिसते. कारण खेडयातील लोकांच्या हाताला काम नाही म्हणून मोठया प्रमाणात ग्रामीण जनता स्थलांतरित होत आहे. अशा स्थ्शलांतरित होणाऱ्या ग्रामीण जनतेच्या हाती काम मिळवून देण्यासाठी लघु उद्योग, कुटीरउद्योग, शेळीपालन, मस्त्यपालन, दुग्धव्यवसाय, इत्यादी अनेक उपक्रम ग्रामीण भागात आणले पाहिजे.

भारतीय स्वराज्य म्हणजे तेथील सर्व लोकांचे आणि न्यायाचे राज्य त्या राज्यातील मंत्री हिंदु, मुसलमान, शिख कोणीही असोत त्या राज्यातील विधिमंडळातले सर्व सभासद हे कोणत्याही जमातीचे असोत त्यांना सर्व जनतेला समानतेने व न्यायाने वागविणे भाग पडले. भारतातील बहूसंख्य लोक गरीब शेतकरी असल्यामुळे त्यांचे हितरक्षण हे आद्यकर्तव्य आहे.

मोठया उद्योगांना म. गांधी विरोध करतात. मोठ मोठे उद्योगधंदे सुरूवात झाले तर त्याच्या स्पर्धेमुळे लघुउद्योग, कुटीरउद्योग नष्ट होतील. त्यातून मोठया प्रमाणात बेकारीची समस्या निर्माण होईल. त्यातून

सामान्य ग्रामीण माणूस भरकटला जाईल. म. गांधीजींच्या स्वाय्यत ग्रामसंस्थेची व विकेंद्रीत ग्रामउद्योगांच्या अर्थशास्त्राची आदर्श इमारत मानवी मुल्ये, शारिरीक श्रम, साधे जीवन व अहिंसा या चार महत्वाच्या तत्वावर आधारलेली आहेत. व्यक्तीने भौतिक साधनसंपत्तीच्या मागे लागू नये. साधन सामुग्रीच्या मागे लागल्यामुळे शोषणास व साम्राज्यवादास चालना मिळते. मानव कल्याण हे राज्यसंस्थेचे ध्येय आहे. या ध्येयाची पूर्तता करणारी राज्यात लोकनियुक्त व लोकसहभागी शासनयंत्रणा असावी लागते. आज बहुसंख्य देश लोकशाहीचा गौरव करतात दिसतात  नव्हे, आम्ही स्वीकारलेलीचं खरी लोकशाही आहे, असे सांगण्यासाठी परस्परांमध्ये स्पर्धा करत आहेत.

**ग्राम स्वराज्यातून ग्रामीणविकास** :– पंचायत राज हा गांधीविचारातून घेतलेला आदर्श आहे. सत्ताविकेंद्रीकरण करून सत्ता शेवटी गावकऱ्यांच्या हाती सोपवणे, या उदेशाने उचललेले क्रांतिकारी पाऊल आहे. पंचायतराजमधून किमान सत्ता गावापर्यंत पोहोचली खरी पण पंचाची सत्ता आली, ती गावकऱ्यांची सत्ता झाली नाही. सध्या गावाला व स्थानिक स्वराज्याला व्यापक अधिकार देण्याचा संकल्प जाहीर करण्यात आला.

लोकशाहीचे प्रत्यक्ष अनुभव लोककल्याणापेक्षा लोकरंजनाला महत्व ठरले आहेत. गांधीजींनी सांगितलेलले ग्रामस्वराज्यही लोकशाहीवादीचं आहे. आजच्या लोकशाहीतील निवडणुकांत प्रलोभने, दमन, संकुचित जात, धर्म, प्रांतभावना वाढत आहेत. गोरगरिबांना याचा उपयोग होण्याऐवजी उपद्रव होत आहे. म्हणून गांधींजींनी 'प्रजासत्ताक ग्रामाची' कल्पना मांडली आहे. ग्रामस्वराज्यात ग्रामसभेस सार्वभौम बनविले आहे. ग्रामसभेमुळे गाव प्रतिनिधी गावाबाहेर पाठवावा लागणार नाही. गावात सर्व एकत्र जमू शकतात.

गांधीजींच्या मते खऱ्या अर्थाने जनतेचे राज्य प्रस्थापित करावयाचे असेल तर विकेंदीत राज्यव्यवस्था, विकेंद्रित अर्थव्यवस्था, व समाजाचे प्रत्यक्ष सामूहिक योगदान व नियंत्रण या गोष्टीशिवाय तरणोपाय नाही. ग्रामीण विकासाची दिशा ग्रामस्वराज्यात आहे. गांधीविचार तंतोतंत स्वीकारला नसला तरी त्यांच्या विचाराला पूर्णपणे बाजूला ठेवूनही भारतातील ग्रामीण विकास साधता येणार नाही. हे कोणीही अमान्य करत नाही. स्थानिक स्वराज्य संस्थाचे वाढते अधिकार व महत्व हा गांधीविचारांचा विजय आहे.

**संदर्भग्रंथ** :–

1) एम. के. गांधी ग्राम स्वराज्य महाराष्ट्र गांधी स्मारक निधी प्रकाशन पुणे (1995)
2) गंगाप्रसाद अग्रवाल हिंदस्वराज्य मार्गदर्शन दस्तावेज साम्ययोग साधना प्रकाशन धुळे (2004)
3) प्रा. रमेश पानसे,  नई तालीम  गांधीप्रणित शिक्षणविषयक प्रयोगांचा इतिहास डायमंड पब्लिकेशन्स पुणे.
4) महात्मा गांधी के विचार आर. के. प्रभु व यु. एल. राव नॅशनल बुक ट्रस्ट इंडिया, दिल्ली.
5) गांधी कार्य व विचारप्रणाली भास्कर रामचंद्र बापट, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई.
6) धर्माधिकारी भाऊ (संपा) गांधी विचार दर्शन ग्राम स्वराज्य खंड 8 महाराष्ट्र गांधी स्मारक निधी, प्रकाशन पुणे.
7) वं. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज ग्रामगिता आत्मानुसंधान प्रकाशन अडयाळ टेकडी.

ISSN No.2394-8426 with Impact Factor 3.325 | UGC Approved Journal Sr. No. 48455

# ग्रामीण विकास आणि गांधीवादी विचारधारा

प्रा. डॉ. नंदाजी सातपूते
राज्यशास्त्र विभाग प्रमूख व संशोधक मार्गदर्शक
महीला महाविद्यालय, गडचिरोली जि. गडचिरोली

**सारांश** :– भारत कृषिप्रधान आणि खेडयांचा देश आहे. आजही 72 टक्के (2001 च्या जनगणनेनुसार) जनता खेडयात वा ग्रामीण भागात निवास करते. जवळपास साडेपाच लाख खेडी असलेला हा देश आहे. आपल्या देशाची ओळख या व अशा महत्वाच्या मुद्यावरून केली जाते.

ग्रामीण समुदाय हा नागरी समुदायापेक्षा सर्वस्वी भिन्न प्रकारचा आहे. जीवनपध्दती, सामाजिक, आर्थिक व्यवहार, एकूण संस्कृतीत वेगळेपणा आहे. या वेगळेपणामुळेच ग्रामीण भागाच्या अभ्यासाला प्रारंभ झाला. औद्योगिक क्रांतीमुळे मानवाच्या संपुर्ण अंगात कमी – अधिक प्रमाणात बदल घडून आला. जागतिक पातळीचा विचार करता एकूण लोकसंख्येच्या 75 टक्के लोकसंख्या गाव – खेडयात वास्तव्य करते. भारतात 72 टक्के जनता गाव – खेडयात वास्तव्य करते. भारतीय समाजाच्या उत्क्रांतीचा अभ्यास करताना ग्रामीण भागाचा अभ्यास करावाच लागतो. कारण भारतीय खेडयांना पाच हजार वर्षाची परंपरा लाभली आहे.

**प्रस्तावना** :– ग्रामीण समाजव्यवस्था जाती – जातीमध्ये विभागल्या गेली होती. एक दुसऱ्याला श्रेष्ठ – कनिष्ठता, उच्च –नीचता यामध्ये पूर्णपणे बांधल्या गेली होती. कोणी कितीही लायक असला तरी त्याला वरच्या जातीत प्रवेश नव्हता आणि वरच्या वर्गातील व्यक्ती कितीही नालायक असला तरी त्याला खालच्या जातीत येता येत नव्हते. अर्थात सर्व जाती हया एक दुसऱ्यापासून दुर व स्वतंत्र होत्या. गांधीजी म्हणतात की, " मी असा भारत निर्माण करण्याचा प्रयत्न करीन जे उच्च – नीच वर्गामध्ये भेद राहणार नाही व जेथे निरनिराळया पंथामध्ये पूर्णपणे सामंजस्य राहील.

एकूणच ग्रामीण समाजजीवनात सजातीयता असते. बहुजातीय धार्मिक लोक एकत्रित वास्तव्य करतात. अर्थात ते जवळचे व नातेवाईक असतात. त्याची संख्या कमी, लहान लहान आकार त्यामुळे अनौपचारिक संबध असतात. या गावा खेडयाच्या विकासाकरीता त्यांच्यातील मानवीय मूल्यांची प्रतिष्ठापना करण्याकरीता किंवा त्याची पुर्नबांधणी करण्याकरीता महात्मा गांधीजींनी अनेक कार्यक्रमाव्दारे प्रबोधन घडवून आणले. ग्रामीणाच्या विकासाकरीता चरखा महत्वाचा मानला याव्दारा सर्वाना रोजगार मिळेल आपल्याला आत्मसन्मान व स्वावलंबीही प्राप्त होईल, चरख्यासंबधी ते म्हणतात की, " हे ईश्वरा, मरण देशील तेव्हा असे मरण दे की, एका हातात चरख्याचा दंडा असेल व दुसऱ्या हातात पेळू राहील."

**ग्रामीण विकास आणि गांधीवादी विचार** :– 19 व्या शतकांनंतर भारतीय स्वातंत्र्यांची चळवळ जोर धरत होती. लोकमान्य टिळकासारख्या मोठया नेत्याचा नेतृत्वात स्वातंत्र्याचा लढा लढला जात होता. कॉग्रेस सोबत होती. परतू 31 जुर्ले 1920 मध्ये लोकमान्य टिळकांचे निधन झाल्यानंतर महात्मा गांधीकडे कॉग्रेसची धुरा आली. त्यांनी कॉग्रेसच्या व्यासपिठावरूनही गाव – खेडयांचा कल्याणाचा विषय मांडला. अस्पृश्यता निवारण, स्त्री – पुरूष समानता, मंदिर प्रवेश, सहभोजन, खादीचा वापर, चरखा, सुतकताई, नई तालीम, नई शिक्षणप्रणाली अशा अनेक मुद्याचा समावेश ग्रामीण विकासाकरीता मांडला.

महात्मा गांधीजींचे बहुआयामी व्यक्तिमत्व होते. त्यांनी समाज व देश विकासाच्या दृष्टिने सर्वांगिंण विचार केला चिंतन, मनन केले, असे एकही क्षेत्र नाही की, ज्यावर गांधीजींनी आपले विचार व्यक्त केले नाहीत. या शोध निबंधामध्ये ग्रामीण विकासासंदर्भात महात्मा गांधीजींचे विचार पाहण्याचा प्रयत्न केला आहे.

एवढी मोठी लोकसंख्या ग्रामीण भागात वास्तव्य करते. त्यामुळे त्यांच्याकडे प्रामुख्याने लक्ष देण्याची आवश्यकता त्यांनी प्रतिपादन केली.

**आर्थिक विकास आणि गांधीवादी विचार** :– ग्रामीण भागात गरिबी व दारिद्रय पराकोटीचे आहे त्या करीता महात्मा गांधीजींनी गृहउद्योग व लघुउद्योगाला प्रोत्साहन दिले. चरखा, सूतकताई हे त्यापैकीच होत. त्या गृहउद्योगामुळे रोजगार मिळेल तर खायला मिळेल. गरिबी राहणार नाही आणि स्वदेशी वस्तूही वापरता येईल. याकरिता गावातच रोजगार निर्माण करण्यावर त्यांचा भर होता. त्याकरीता ते आग्रही होते.

सर्वोदयामध्ये सर्वांचे कल्याण व हित सामावलेले आहे. मानवी कल्याणाकरिता विकसित केलेली एक रचना होय की, ज्या व्दारा प्रेम, शांती, सत्य, अंहिंसा इत्यांदी मुल्याची जोपासना व पुर्वस्थापना करायची होती. त्याच्या मते, सरकारी धोरणे आणि पैसा, संपत्ती वा शक्तिव्दारा मानवाचे सर्वांगिण कल्याण न होता मानवीय मुल्यच ते करू शकते. या सर्वोदय चळवळीचे प्रणेते महात्मा गांधी होते.

महात्मा गांधीजी आधुनिक काळातील संघर्षमय परिस्थिती सोडून नवी समाजरचना निर्माण करण्याच्या विचाराचे होते. ज्यामध्ये प्रेम, सत्य, अंहिसा, अस्तेय, ब्रम्हाचर्य, अपरिग्रह, शरीरश्रम, स्वदेशी, अस्पृश्यता निवारण, सहिष्णूता, शेतीचा विकास इत्यादीचा समावेश असेल. याकरिता "रामराज्य" ची संकल्पना विशद केली. गाव खेडयांच्या पर्यायाने भारताच्या विकासाकरीता ते आग्रही होते. त्यांच्या कल्याणाकरीता त्यांनी विविध आघांडयांवर आंदोलने व चळवळी उभारल्या. स्वातंत्र्य आंदोलनात ते अग्रस्थानी होते. त्यांनी देश बांधणीत स्वतंत्र पातळीवरून भरीव प्रयत्न केले गावाकडे चला, गाव स्वंयपूर्ण झाल्याशिवाय देश स्वंयपूर्ण होणार नाही.

आज ग्रामीण भारतासमोर अनेक समस्या आहेत. या समस्यांनी अतिशय उग्र स्वरूप धारण केलेले आहे. दरडोई उत्पन्न कमी, दारिद्रय, बेकारी, आर्थिक समता, विकासातील असमतोल, बचतीचे व भांडवल निर्मितीचे प्रमाण कमी, मागासलेपणा, अज्ञान, अंधश्रध्दा, निरक्षरता लोकसंख्या वाढ इत्यादी.

महात्मा गांधी यांनी म्हटले आहे खरा भारत खेडयात वसलेला आहे. त्याकरीता खेडया चला अशा स्वरूपाचा नारा त्यांनी दिला होता. त्याकरिता त्यांनी सेवाग्राम हा आश्रम वर्धा येथे संपन्न केलेला होता. या आश्रमात त्यांनी लोकांना राहणीमान लोकांना स्वातंत्र्याच्या लढयात सहभागी करून घेण्याबाबत धडे दिले. एकूण लोकसंख्येपैकी 70 टक्के लोकसंख्या खेडयात राहते. त्याकरिता खेडी सुधारली तर देश सुधारेल.

पोटाची भूक ही सर्वात महत्वाची आहे. त्याकरिता कामगारांना काम देवून त्यांना अर्थाजनांचे साधन उपलब्ध करून दिले पाहिजे. असे त्यांचे मत होते. हा देश गरीब व्यक्तीचा आहे. अतिशय गरिबीतून लोक जीवन जगत असतात. त्याकरिता रोजगाराची सुविधा उपलब्ध करून दिली तर त्यांचे अर्थाजन चांगले होईल व भाकरीची भूक भागेल.

अन्न, वस्त्र, आणि निवारा या माणसाच्या मूलभुत गरजा होत. त्या प्रत्येकाला मिळविण्याचा हक्क आहे. त्याकरिता रोजगाराची उपलब्धतता करून दिली पाहिजे. भारतात बहुसंख्य जनता अर्धवस्त्र व उघडयावर राहते. त्याकरिता त्यांना या सुविधा उपलब्ध करून दिल्या पाहिजे, असे त्यांचे मत होते.

देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी महात्मा गांधींनी सत्याग्रह, सविनय कायदेभंग, असहकार, उपोषण, चंपारण्य आंदोलन, चले चाव आंदोलन इत्यादी आयुधांच्या माध्यमातून आंदोलन केली आणि देशाला स्वातंत्र्य मिळवून दिले. परंतू देशाला स्वातंत्र्य मिळवून देणे एवढंच गांधीजींचे मर्यादित स्वप्न होते. भारत हा कृषीप्रधान देश असून खेडयांचा देश आहे आणि खरा भारत हा ग्रामीण भागात आहे, छोटया मोठया शहरात नाही. म्हणून महात्मा गांधी म्हणत की, "खेडयाकडे चला" किंवा खेडयांचा विकास म्हणजेच भारताचा विकास"कारण एकूण लोकसंख्येच्या 80 टक्के लोक ग्रामीण भागात वास्तव्य करत असल्यामुळे प्रसिध्द आखरी

वसियतनामे में गांधीजीने कहा था की,'' भारतने राजनितिक स्वातंत्र्य तो प्राप्त करलिया है, लेकीन उसे अभी शहरों और कस्बों सें भिन्न अपने सात लाख गावों के लिए सामाजिक, आर्थिक और नैतिक स्वतंत्र्य प्राप्त करना बाकी है ।

**महात्मा गांधी व पंचायतराज** :– गांधीजींची पंचायतराज ही कल्पना आदर्श कल्पना होती. गांधीजीं म्हणतात की, ''केवल गावों को किसी का मोहताज न रहना पडे बल्कि अपनी जरूरतों की सभी चिजें स्वयं पैदा करें । इस के लिए खेती बाडी किया करें, घरेलु उद्योग धंदे किया करें तथा गांवों कों साफ सुधरा रखा करें और आपसी झगडों का निपटारा भी खुद ही कर लिया करें ।''

गांधीजींच्या कल्पनेप्रमाणे ग्रामस्वराज्य योजनेमध्ये ग्रामसेवक हा केंद्रस्थानी आहे. कारण तो गावच्या विकासाचे नियोजन अशाप्रकारे करेल की, ज्यामुळे शेती आणि ग्रामउद्योगांच्या माध्यमातून गाव स्वंयपूर्ण व स्वावलंबी बनेल. तो ग्रामवासींयांना आरोग्याचे आणि स्वच्छतेचे शिक्षण, प्रशिक्षण देईल. तसेच तो लोकांचे आरोग्य बिघडणार नाही आणि गावात रोगांची लागण होणार नाही.

राजकीय क्षेत्राप्रमाणेच आर्थिक आणि औद्योगिक क्षेत्रातही गांधीजींनी विकेंद्रीकरणाचा आग्रह धरलेला होता. त्यांच्या मते ''मोठया उद्योगधंद्यामुळे उत्पादनांचे व संपत्तीचे केंद्रीकरण होते आणि आर्थिक विषमता निर्माण होते. त्यातून लहान लहान उद्योग बंद पडतील आणि दारिद्रय आणि बेकारी कमी होण्याऐवजी वाढेल.

गांधीजींचा औद्योगिकरण व यांत्रिकीकरणाला विरोध होता. परतू ज्या यंत्राच्या वापरामूळे कामगारांच्या हातचे काम काढून घेतले जाईल अशा यंत्राला गांधीजींच्या मते, काम हाताला हवे आहे यंत्राला नव्हे. म्हणून मानवी जीवन उद्ध्वस्त करणाऱ्या यंत्राला गांधीजींचा विरोध होता. तसे पाहिले तर हे सुध्दा एक यंत्रच होते, परंतु त्याचा पुरस्कार केला.

**संदर्भग्रंथ** :–

1) कऱ्हाडे बि. एम. 2005 ग्रामीण व नागरी समाजरचना पिंपळपूरे अँड कं. पब्लिशर्स नागपूर
2) महात्मा गांधी 2001 माझ्या स्वप्नातील भारत परधान प्रकाशन पवनार वर्धा.
3) भारतीय नियोजनाची पन्नास वर्षे डॉ. मेधा कानेटकर साईनाथ प्रकाशन नागपूर
4) ग्रामस्वराज्य गांधीजी संग्राहक, हरिप्रसाद व्यास नवजीवन प्रकाशन मंदिर अहमदाबाद 14
5) महात्मा गांधी व्यक्ति और विचार विश्व प्रकाश गुप्त तथा मोहनी गुप्त, राधा पब्लिकेशन्स नई दिल्ली.
6) गांधी सामाजिक राजनैतिक परिवर्तन हरीश कुमार अर्जुन पब्लिशिंग हाऊस दिल्ली.

# गांधी विचार – एक परिप्रेक्ष्य

प्रा. राजेश एस. डोंगरे
(वाणिज्य विभाग)
गुरूकुल कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नांदा

**गोषवारा :–**

गांधीवादी तत्वज्ञान हे सर्वव्यापी तत्वज्ञान म्हणुन पुढे आले आहेत. त्यांच्या तत्वज्ञानाचा पाया सत्य व अहिंसा हा असला तरी त्याला अनेक पैलु पडलेले आहेत, म्हणुनच गांधी तत्वज्ञानाला एक चौकटीत बांधता येत नाही. सामाजिक जडण–घडणीपासुन ते लोकशाहीच्या बांधनीपर्यंत किंबहुना त्याही पलीकडे त्यांचे तत्वज्ञान गेलेले आहे. परीवर्तनाची प्रक्रिया, कल्याणाची संकल्पना, नैतिकतेचे आयाम अर्थाजनाचा मुलमंत्र,जुलमी व्यवस्थेचा विरोध हे सगळच गांधी विचारातुन पुढे आलेले आहे. यालाच आपण वैचारीक संस्कार असे म्हणतो. वैचारीक संस्कार या सोजवळ शब्द इतकेच गांधी विचारांचे प्रत्येक पैलु म्हणजेच गांधी तत्वज्ञान सोजवळतेने पुढे आले आहे. अन्यायाचा प्रतिकार करत असतांनाही वैरवृत्तीचा पुर्णपणे अभाव परंतु विरवृत्तीचे दर्शन त्यातुन घडते. असे हे गांधी विचारांचे असंख्य,पैलु त्यातील काहीचा हा परामर्श.

**बिजशब्द** :– गांधी तत्वज्ञान,मानवतावाद,नितीमुल्ये,सर्वोदय आणि मानवी कल्याण

## प्रस्तावना :–

आजच्या भरकटलेल्या समाजात सामाजिक मुल्ये जोपासण्याची खरी गरज आहेत. दडपण,जबरदस्ती, कायदे कानुन हे सर्व धाब्यावर बसवुन अनिष्ठ प्रथा,भोंदुगिरी,बळावत चालली आहे. दहशतवाद,भष्ट्राचार याने देश पोखरला जात आहे. तेव्हा या सर्वानवर भावनिक
बुध्दीमत्तेचा वापर हाच पुन्हा उदयाला यावा अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. तेव्हा पुन्हा गांधीवादाचे स्मरण झाल्याशिवाय राहत नाही. गांधी विचारात आत्मशक्तीला महत्वाचे स्थान आहे. आज गांधी विचारच देशाला तारू शकतो याची पुन्हा नव्हाणे ओळख व्हायला लागली आहे.समुपदेशन हा याचाच एक भाग होय. जी गोष्ट शस्त्राने साध्य करता येत नाही ती समुपदेशाने साध्य होते. ही आज जनता मान्य करायला लागली आहे. प्रमाने जगही जिंकता येते हा विचार सर्वमान्य असला तरी सर्व प्रतिबिंबित मात्र तो नाही. याकरीताच गांधी विचारांचा किंवा त्याच्या पैलुचा काहीसा परिप्रेक्ष्य इथे माडण्याचा प्रयत्न केला आहे.

## अहिंसा :–

गांधीनी अहिंसेच्या मार्गानेच स्वतंत्रता आदोलनात सत्याग्रहाचाच सशक्तपणे वापर केला आणि मार्ग त्यांनी जनतेला देखील सांगीतला आणि त्यामुळेच अहिंसा आणि सत्याग्रह हे एकमेकांशी निगडीत असा जोडशब्द निर्माण झाला. गांधींना जेव्हा–जेव्हा सत्याग्रह करण्याची गरज पडली तेव्हा–तेव्हा तो अहिंसेच्या मार्गानेच केला गेला आणि हाच सल्ला त्यांनी जनतेला देखील दिला. गांधीचा हा विचार आजही तितकाच सदृढ आणि सबळ सिध्द होत असल्यामुळेच अन्यायाचा विरोध करण्याचा अहिसात्मक मार्ग म्हणजे सत्याग्रह होय याची प्रचीती येते.

## ग्रामीण अर्थव्यवस्था :–

गांधीनी अर्थशास्त्र विषयक विचार मांडतांना म्हटले आहे की, “खरा अर्थशास्त्रज्ञ कधीच सर्वाधिक नैतीक स्तराचा विरोध करीत नसतो,जसे खरे नितीशास्त्रज्ञ हे निश्चितच चांगले अर्थशास्त्रज्ञ असायला हवेत जे अर्थशास्त्रज्ञ कुबेराची पुजा करतात आणि जे आर्थिकरित्या समृध्द आहेत. त्यांना विकासाला चालना देऊन त्या आधारे दुर्बल घटकांना देखील विकसीत होण्याची संधी निर्माण करून देतात. खरा अर्थशास्त्रज्ञ हा सामाजिक न्यायाचे प्रतिक असतो तो सर्वाच्याच कल्याणाचा विचार करतो”

गांधीच्या अर्थशास्त्राचा पाया हा ग्रामीण अर्थव्यवस्था हाच होता. त्यांच्या मते भारतातील बहुसंख्य लोक हे ग्रामीण भागात वास्तव्य करतात त्यामुळे ग्रामीण जनतेचे आर्थिक आणि सामाजिक उत्थान करण्याकरीता देशाला विदेशी शासनापासुन मुक्त करणे हे प्रमुख ध्येय ठेवले. शहर आणि खेडे यातील आर्थिक आणि सामाजिक विषमता दुर करण्याचा सदेश ही त्यांनी जनतेला दिला ग्रामीण–उद्योग जसे–लघु उद्योग, कुटीर उद्योग यांना चालना देऊन ग्रामीण अर्थव्यवस्था बळकट होऊ शकते हाही विचार त्यांनी मांडला याव्दारे कमीत–कमी भांडवला मध्ये आर्थिक प्रगती साधली जाऊ शकते हे देखील त्यांनी पटवुन दिले. त्यामुळेच गांधी अर्थशास्त्राला ग्रामीण अर्थशास्त्र असे

संबोधले जाते. गांधी अर्थशास्त्र किंवा त्यांच्या आर्थिक विचारांचा पाया हा 'मानवता' हाच असल्यामुळे त्यांच्या विचाराचे एक मात्र लक्ष मानव उध्दार व त्यातुन सामाजिक परिवर्तनाची दिशा हाच होता. त्यांच्या मते आर्थिक सामर्थ्य हे केवळ धनसंच यात नसुन त्याचा समान वितरणात आहे. सामाजिक वितरणामुळे समाजातील असमानता दुर करून सामाजिक परिवर्तनाला एक नविन दिशा देता येऊ शकते.

**शैक्षणिक विचार :–**

गांधीनी स्वातंत्र्यानंतर शैक्षणिक क्षेत्रात देश कसा असावा यावर आपले विचार मांडले होते. यात त्यांनी शिक्षणाचा खरा उद्देश राष्ट्रीय शिक्षण, बुनोयादी शिक्षण,बालशिक्षण,प्रौढ शिक्षण,नवी तालीम,स्त्रि शिक्षा आणि राष्ट्र भाषेच्या आवश्यकतेला अधिक महत्व दिले. त्यांनी आपले चिंतन आणि विचार मंथनातुन राष्ट्राला उन्नतीच्या दिशेने अमुलाग्र परिवर्तनाची आवश्यकता प्रतिपादीत केली याकरीता शिक्षण किती मौल्यवान आहे, हे ही पटवुन दिले. बुनीयादी शिक्षणावर त्यांनी विशेषभर दिला.

महात्मा गांधी आणि अहिंसा हे दोन्हीही जणु पर्यायवाची शब्दच आहेत की काय असा भास व्हावा त्याला कारणही तसेच आहे. अहिंसेचा सिध्दांत जो भारतीय संस्कृतीचा मुळ आधार समजला जातो. त्याला आधुनिक युगात जागतिक पातळीवर प्रस्तापीत करण्याचे क्षेय महात्मा गांधीनाच आहेत. अहिंसेच्या सिध्दांताव्दारेच गांधीनी जगाला मानवतेचा संदेश दिला. गांधी विचाराचा हा अत्यंत मौलीक असा पैलु मानला जातो. हा पैलु किंवा अहिंसेचा विचार गांधीनी सकल

विश्वात पोहचविला व हा संदेश पोहचवितांना त्यातुन गांधी विचारांच्या अनेक पैलुचे दर्शन घडते.

ज्या शिक्षणाव्दारे स्वतःची ओळख होते तेच खरे शिक्षण अशी त्यांनी बुनीयादी शिक्षणाची व्याख्या केली. शिक्षक आणि विद्यार्थी यांचा मधील आंतरसंबंध हे अंतर मनातुन असावित असा त्यांचा विचार होता. प्रत्येक शिक्षक आपल्या विद्यार्थ्याला आत्मदर्शन करून देण्यात यशस्वी व्हावा असी त्यांची अपेक्षा होती. गांधीच्या या विचारांची प्रचती आजही येते. आजचा विद्यार्थी जेव्हा नैराश्येत जातो. त्यामागील प्रमुख कारण या विद्यार्थ्याला त्यांचे स्वतःचे आत्मदर्शन घडविण्यात पालकांसोबतच शिक्षकही अपयशी ठरलेले असतात. विद्यार्थ्यांच्या मनाचा कल जाणुन न घेता त्यावर शिक्षणाची सक्ती केली जाते. त्याची अभिरूची काही वेगळीच असते त्याकडे पुर्ण दुर्लक्ष होते. मग तो विद्यार्थी नैराश्येत जाणार नाही तर काय? बुनयादी शिक्षणात यालाच विशेष महत्व दिले जात होते. गांधीचे मौलीक विचार आजही ग्रहण करणे योग्यच आहेत.

**गांधी आणि पत्रकारीता :–**

कोणत्याही गोष्टीला प्रसिध्दी देण्याच प्रमुख माध्यम म्हणुन पत्रकारीतेचा जन्म झाला. अहिंसेच्या प्रचाराकरीताच गांधीमधील पत्रकारही उदयाला आला. त्याशिवाय पत्रकारीतेच्या माध्यमातुन काही असामाजिक तत्वांनीही आपला हेतु साध्य करण्याचा प्रयत्न केला. त्यावरही गांधीनी कुठाराघात केला. गांधीच्या पत्रकारीतेचा पाया हा मार्गदर्शकाचा होता. पत्रकारीता किंवा वृत्तपत्रे हा समाजाचा आरसा असुन त्यात समाजाचे खरे खुरे प्रतिबिंब दाखवावे ही पत्रकाराची खरी जबाबदारी असते. पत्रकारीता ही सन्मानजनक ,नैतिकतापुर्ण,जबाबदारीचे भान ठेवणे यातुनच समाजाचे खरे चित्र उभे करता येते. यातच पत्रकारीतेची सार्थकता असते.पत्रकारीते बाबतीतही गांधी वैज्ञानिक दृष्टी ठेवत असत, त्यांच्या मते,वास्तविकतेच्या खोलीपर्यंत शिरून निरिक्षणाव्दारे संशोधन करण्याची वृत्ती ठेवल्याशिवाय पत्रकारीतेच्या क्षेत्रात यशस्वी होता येत नाही. पत्रकाराने स्वतःच्या आत्म्याचा आवाज ऐकला पाहिजे. गांधीजी पत्रकारीतेविषयीची हीच कल्पना आजही साकार होण्याची गरज आहे.

**सत्याग्रह :–**

गांधीच्या नामोच्चारा बरोबरच अहिंसेच्या सोबतच येणारा दुसरा शब्द म्हणजे सत्याग्रह होय. सत्याग्रहाची संकल्पना ही गांधी विचारातुन उदयाला आली आहे. सत्याग्रहाचा सिध्दांत देखील गांधीनी सकल विश्वाला दिलेला आहे. कुठल्याही कठीण समस्येवर उपाय किंवा त्या समस्येला मुळासकट नष्ट करण्याचे प्रमुख साधन किंवा मार्ग म्हणजे सत्याग्रह होय. गांधीनी सत्याग्रहाचा अर्थ स्पष्ट करताना म्हटले आहे, की सत्य आणि बळ याचा अवलंब म्हणजे स्वतःला कष्ट देऊन सत्याचे दर्शन घडविणे दुसऱ्या भाषेत ते असेही महणतात सत्य अधिक आग्रह म्हणजेच सत्याचा आग्रह असा तो सत्याग्रह होय गांधी अशा या सत्याग्रहाचा वापर करूनच सामाजिक आणि राजकिय दुर्गुणाचा नायनाट करण्याचा प्रयत्न करीत असत. म्हणुनच गांधीनी स्वत्रंतता आंदोलन देखील सत्याग्रहाच्या माध्यमानेच केले.

**सर्वोदय संकल्पना :–**

सर्वोदय संकल्पना गांधी विचाराचीच एक महत्वपुर्ण देणगी होय. समाजातील सर्व स्तरावरील जनतेचे व्यापक कल्याण म्हणजे सर्वोदय गाधी सर्वोदयाबद्दल लिहताना म्हणतात सर्वांच्या कल्याणात आपले कल्याण आहे.

- वकिल काय किंवा हजाम काय दोघांच्याही कामाची किंमत सारखीच असली पाहीजे. कारण पोटापाण्याचा हक्क दोघांचाही सारखाच आहे.
- साधे अंग मेहनतीचे भोतकऱ्यांचे जिवन हेच खरे जिवन होय.

पुढे गांधी म्हणतात पहिली गोष्ट मला माहित होती. दुसरी गोष्ट मला अस्पष्ट दिसत होती. तिसरीचा मी विचारच केला नव्हता. पहिली मध्ये दुसऱ्या दोन्ही गोष्टी समाविष्ठ आहे. हे मला सर्वोदयनी दाखविले. गांधीजींच्या मते सर्वोदय ही अशी संकल्पना आहे, जी व्यक्तीत्व निर्मानाचा पाया रचते, सर्वोदय एक अशा समाज निर्मीतीचे स्वप्न होय जे समाजातिल सर्व वाईट गोष्टींना दुर ठेवते. आजच्या युगातही समाजाच्या पोषणाकरीता म्हणजेच समाजातील सर्व वाईट गोष्टी दुर सारुन प्रत्येकालाच स्वतःची प्रगती करण्याचा अधिकार आहे. प्रत्येक व्यक्ती प्रगतीच्या दिशेने वाटचाल करीत राहील्यास सर्वांचाच उदय म्हणजेच सर्वोदय होईल.

**निष्कर्ष :-**

गांधी विचारांची दिशा ठरविणे म्हणजे गांधी विचारांना संकुचीत करणे होय. इतकी त्यांच्या विचारांची किरणे पसरली होती. त्यांच्या विचारांचा समग्र अभ्यास एका छोट्या निबंधातुन होणे अशक्य काटीतील गोष्ट आहेत. त्यांच्या विचारातील काही भाग यात मांडण्याचा प्रयत्न झालेला आहेत. अर्थात तोही अगदीच थोडक्यात गांधी आणि अहिंसा हा जणु,अविभक्तच भागच होय. अहिंसा हे गांधींच्या रोम-रोमात वसले होते व ते सर्वत्र पसरविण्या करीता पत्रकारीता हे अमोध शस्त्र त्यांनी वापरले त्यातील अनिष्ठता दुर सारुन पत्रकारीतेलाही त्यांनी शुचीर्भुत केले. न्याय मिळविण्याचा किंवा अन्यायाला वाचा फोडण्याचा हक्क प्रत्येकानेच बजावला पाहिजे. परंतु तोही वाद-विवादाशिवाय याकरीता त्यांनी सत्याग्रहाचे शस्त्र वापरले. सत्याचा आग्रही तोही अहिंसेच्या मार्गाने मग न्याय कसा नाही मिळणार. गांधींनी ग्रामीण जनतेच्या उत्थानाकरीता ग्रामीण अर्थव्यवस्थेचा पाया रचला ग्रामीण जनतेला परिवर्तनाची दिशा दिली आणि मानवतेचा संदेश दिला म्हणजेच त्यांच्या अर्थशास्त्राच्या मुलाधार हा नैतिकता होता हे यातुन सिध्द होते. शिक्षणाशिवाय पर्याय नाही आणि तेही शिक्षण आत्मोन्नोतीचे असावे असा त्याचा आग्रह होता. प्रथम आत्म्याची ओळख म्हणजेच स्वतःचे भान येणे गरजेचे आहे व त्याकरीता त्यांनी बुनीयादी शिक्षणाचा पाया रोवला तळागळाचा व्यक्ती हा तिथुन निघाला पाहिजे त्याचेही उत्थान झाले पाहिजे पण ते होणार कसे, तर प्रगतीशिल माणसाने खालच्याला हात देऊन वर खेचने तेव्हाच तळागळातील माणुस वर खेचला जाईल याचाच अर्थ प्रत्येकाने आपली उन्नती केली पाहिजे.

एकंदरीत सर्वांचाच उदय म्हणजेच सर्वोदय झाला पाहिजे ही गांधीची सर्वोदयाची संकल्पना आजही गरजेची आहे.

**संदर्भ :-**

1) महात्मा गांधी, सत्याचे प्रयोग, नवजिवन प्रकाशन मंदिर अहमदाबाद
2) कुंभार नागोराव,(संपादन) गांधी विचार दर्शन, प्रबोधन प्रकाशन, लातुर 1995
3) भारदे बाळासाहेब, गांधी विचार-विमांसा, महाराष्ट्र गांधी स्मारक, निधी प्रकाशन पुणे 1993
4) अनुवाद-चोहकर पराग, गांधी मोहनदास, हिंद स्वराज्य परमधाम प्रकाशन, पवनार 2006
5) आर. के. प्रभु (अनुवाद ब्रिजमोहन लोढा) 'महात्मा गांधीचे विचार' नवजिवन प्रकाशन मंदिर, अहमदाबाद
6) अभ्यंकर एन.आर., राष्ट्रपीता महात्मा गांधी नॅशनल बुक ट्रस्ट इंडीया, नई दिल्ली,1967

# वर्ण, जाती व अस्पृश्यता निर्मूलण : महात्मा गांधीजींची भूमिका

प्रा. डॉ. व्ही.व्ही. लाडे
सहयोगी प्राध्यापक
कला, वाणिज्य व विज्ञान महाविदयालय
तुकूम चंद्रपूर
मों. नं. ९४०५५२२९१६
**Email:- ladevishwanath@gmail.com**

**मुख्य शब्द (Key Words):—**

वर्णाश्रम व्यवस्था, भूकेकंगालीपासून, जातीव्यवस्था, अस्पृश्यता निर्मूलन, विषमंता, शेडयूल्ड कास्ट्स, पुणे करार, विभक्त मतदार संघ, बाहूले बनण्यास

**सारांश (Abstract) :—**

एकंदरीने असे दिसते की गांधीजी अस्पृश्यता, किंबहुना कसलाही उच्चनिचभाव वा जातीभेद पाळू नये या विचाराचे पहिल्यापासूनच होते. हिंदू धर्मात रूढ झालेले कर्मकांड मात्र न पाळण्याचे त्यांनी विचारपूर्वक ठरविले. हिंदू धर्माचा अभिमान बाळगतांना रूढीने चालत आलेले जातीभेद पाळावेत असे मुळीच नाही. तसाभेदभाव वेदांनी केलेला नाही असे ते म्हणत. पश्चिम युरोपीय औद्योगिक भांडवलशाही सांस्कृतीक स्पर्धा अटळ दिसते. त्यापासून बचावण्यासाठी श्रामविभागणीचा वर्णधर्म उपयुक्त ठरेल असे सन १९२० ते १९३१ पर्यंत त्यांना वाटले व तसे त्यांनी मांडले. जातीभेद व अस्पृश्यता नष्ट व्हावी असे त्यांचे मत होते. व त्याचा त्यांनी हिरीरीने प्रचार केला. आयुष्याच्या अखेरपर्यंत त्यांची धडपड त्या दिशेने चालु होती.

**प्रस्तावना :—**

गांधीजींनी भगवदागिते पासून प्रेरणा घेतली होती. त्यात सांगितले आहे की स्वधर्माचे पालन करता करता मरन आले तरी चालेल परंतु परधर्म स्विकारणे हे भयाणक कृत्य आहे. गांधीजीच्या आर्थिक विचारचा आधार वर्णव्यवस्था आहे. गांधीजींच्या जीवनात अनेक परिवर्तने आली परंतु परंपरागत सामाजिक व आर्थिक व्यवस्थेच्या बाबतीत ते शेवट पर्यंत आपल्या विचारावर ठाम होते.

**वर्णाश्रम व्यवस्था :—**

सन १९२१ ते १९२७ या काळातील लिखानात त्यांनी वर्णाश्रम धर्माचा पुरस्कार केला होता. या विषयांवरील गांधीजींची खरी भूमिका काय होती हे वस्तुनिष्ठपणे समजून घेण्यासाठी गांधीजीच्या लिखानातील काही उतारे पाहणे इष्ट ठरेल.

'' एकेकाळी वर्णाश्रम व्यवस्थेचे आर्थिक दृष्टया मोठे मूल्य होते. वंशपरंपरागत कौशल्ये जपायला त्यामुळे मदत झाली. स्पर्धा मर्यादित करता आली. भूकेकंगालीपासून बचावण्याचा तो उत्तम मार्ग होता. व्यवसाय संस्थेचे सर्व फायदे त्यात होते. साहस व शोधकतेला त्यात प्रेरणा मिळत नव्हती हे खरे आहे पण तिथे फार मोठे अडथेळे निर्माण केले होते असेही म्हणता येणार नाही ''

'' ऐतिहासिक दृष्टीने बोलायचे तर असे म्हणता येईल की भारतीय समाजाच्या प्रयोग शाळेत माणसाने केलेला तो एक प्रयोग वा सामाजिक समायोजन होते. आपण जर तो प्रयोग यशस्वी करुन दाखवू शकले तर हृदयहिन स्पर्धा किंवा हावरटपणा व लालसा यामुळे संभवणारे सामाजिक विघटन यावरिल उत्तम उपाय म्हणून तो प्रयोग जगाला सादर करता येईल.''

" from economic point of view, its value was once very great. It ensured here ditary skill. It limited compeliton. It was the best remedy against pauperism. And it

had all the advanteges of trade guilds. Although it did not faster adventure or innovation there, it is not known to have come in the way either. "

" historically speaking caste may be gregarded as man's experiment or social adjustment in the laboratory of Indian society If we can power it to be success, it can be offered to the world as a leaven and as the best remedy against competition, and social disintegration born out of avasice and greed." (Young India 5/1/1921.)

जीवघेण्या स्पर्धेचे दुष्परिणाम टाळण्यासाठी ज्यांने त्यांने वंश परंपरागत व्यवसाय करावा ही साईस्कर व्यवस्था आहे. असा या परिषेदाचा सूर आहे. जीवघेणी स्पर्धा हा औद्योगिक संस्कृती अंगभूत दोष आहे, म्हणून वर्णाश्रम व्यवस्था हा त्यावरील उपाय होईल असे गांधीजीना वाटले म्हणजे वर्णव्यवस्था जन्मावर आधारलेली आहे असे मनुस्मृतीने माणले आहे. त्या ग्रंथनितर उच्चनिच भाव हा अभेद आहे असेच मानले आहे.

एक राजकीय व्यवस्था म्हणून वर्णाश्रमाची भलाई करणारा उतारा पाहू.

'' जातीची प्रचंड संघटना समाजाच्या धार्मिक गरजा भागवत होती. त्याच बरोबरीने राजकीय गरजाही भागवत होती. ग्रामवासी जनता आपला अंतर्गत कारभार जातीव्यवस्थेच्या मदतीने चालवत होती व त्याद्वारा वरिष्ठ सत्ताधाऱ्यांचा दडपशाहीला तोंड देत होती. जाती व्यवस्था निर्माण करु शकणाऱ्या राष्ट्रांची आश्चर्य कारक संघटन क्षमता कुणालाही नाकारता येणार नाही. ''

"The vast organization of a cast answered not only the religious wonts of the community but if answered its political needs. The villages managed their affairs through the coste system and through it they dealt with any apporession from the suling power or powers. It is not possible to deny of a nation that was capable of producing the caste by stem its wonderful power of organization."

यात समाजाच्या धार्मिक गरजा भागवायला जातीव्यवस्था उपयोगी पडत होती असे म्हणून गांधीजींनी बराच घोटाळा केला आहे. आपल्या परंपरेचा अभिमान प्रकट करण्यापलिकडे त्यांचा या विधानाला काही अर्थ नाही. गावगाडा चालवण्यात जाती व्यवस्थेची मदत इतिहासकाळात घेतली जात होती हे खरे असले तरी त्यामूळे वरिष्ठ सत्ताधाऱ्यांकडून होणाऱ्या अत्याचारापासून व दडपशाही पासून संरक्षण मिळवता येत होते असे मानायला जागा नाही. उलट जाती व्यवस्था हीच कष्टकरी लोकावर अन्याय करित होती, याची जाणीव गांधीजीनी हा लेख लिहीतांना ठेवलेली दिसत नाही.

वर्णाश्रमाचा पुरस्कार करतांना गांधीजीनी भावनिक आवाहन करण्यावर भर दिला होता. सन १९२७ साली एका लेखात ते म्हणतात, '' माणसाचे पृथ्वीतलावर काय कर्तव्य आहे ते वर्णाश्रम धर्म उदरनिर्वाहाचे वेगवेगळे मार्ग धुडण्यासाठी माणसाला रोजरोज जन्म मिळत नसतो, त्याला माणूस जन्म मिळतो तो यासाठी की आपल्या शक्तीचा प्रत्येक अणू त्याने आपल्या निर्मात्याला जाणून घेण्यासाठी उपयोगात आणावा. जिवंत राहण्यासाठी वाडवडिलांचा धंदा करण्याचे बंधन त्याच्यावर घालण्यात येते ते एवढयासाठीच, वर्णाश्रमाचा अर्थ यापेक्षा वेगळा नाही.

"Varnashramdharma detines man's mission on this earth, the is not born day after day to explore avenues for amassing riches and to explore different means of livelihood; on the contry. Man is born in order that he may utilize every atom of this energy for the purpose of knowing his maker It restricts him there fore the

purpose of holding body and soul together, that and nothing more or nothing less is varnashramdharma." (young India 27/10/1927.)

आपला परिग्रहाचा विचार लोकांच्या गळी उतरविण्यासाठी वर्णश्रमधर्माच्या पुरस्कार उपयोगी पडू शकेल असे वाटून त्यांनी अशा प्रकारची मांडणी अट्टाहासाने केलेली दिसते. त्यांनी असेही म्हटले आहे की, आणसाने आपल्या वर्णाचे विहीत काम केले नाही. तर त्यांचा वर्ण संपेल आपल्या आपल्यांना कुठला व्यवसायाचे शिक्षण घावे हे ठरविले या तापित्यांना वर्णाश्रमधर्मामूळे सोपे जाते असे लेखात म्हटले होते.

**जातीव्यवस्था :—**

आजची जातीव्यवस्था आपल्याला मान्य नसल्याचे स्पष्ट प्रतिपादन गांधीजींनी सन १९३१ च्या एका लेखात केले आहे. ते म्हणतात, " मी असे वारंवार म्हटले आहे की आज प्रचलित असलेल्या जातीव्यवस्थेवर माझा विश्वास नाही. ती फेकूण देण्याच्या लायकिची घाण असून प्रगतीला खिळ घालणारी आहे. माणसा — माणसातील विषमतेवरही माझा विश्वास नाही. आपण सगळे जण पूर्णतया समान आहोत पण समता आत्म्याची आहे. शरिराची नाही. ती एक मानसिक अवस्था आहे. आपल्याला सतत समतेचा विचार केला पाहिजे व आग्रह धरल पाहिजे कारण आजच्या जगात विषमता फार वाढलेली आहे. या बाहय विषमतेमध्ये राहत असूनही आपल्याला समता स्थापन करायची आहे. एक जन दुसऱ्यापेक्षा श्रेष्ठ आहे असे मानणे म्हणजे ईश्वर व मानवा विरुध्द केलेले पाप आहे. दर्जा व प्रतिष्ठेत असमानता दाखविणारी जात ही दुष्प्रवृत्ती आहे. "

( I have frequently said that I do not believe in caste in the modern sense. It is an excrescelce and handicap on progress. Nor to I believe in inequalities between human beings. We are all absolute equal. But equality is of soul and not bodies . Hence it is mental state we need to think of and to assert equality by because we see we agreat inequalities in the physical world. We have to realise equality in the midst of this apparent external inequality. Assumption of superiority by any one person over any other is a sin against God and man. Thus caste in so for as it connotes distinctions in status is an evil." (Young India 04/06/1931)

ही त्यांची भूमिका प्रथमपासून अखेरपर्यंत कायम राहिली. सन १९४६ सालीही ते म्हणाले होते की अस्पृश्यता हा हींदु धर्मावरील कलंक आहे! अस्पृश्यता राहणार असेल तर हिंदु धर्म मेलेला बरा!

**अस्पृश्यता निर्मूलन :**

अस्पृश्यता हरवायची आहे तर परत परत त्या शब्दाचा वापर करणे योग्य नाही. ज्या दिशेने जायचे आहे तिच्याशी सुसंगत असा नवा शब्दप्रयोग रूढ केला पाहिजे असे गांधीजींना वाटत होते. सहकाऱ्याशी वारंवार चर्चा करून 'हरिजन' हा शब्द वापरावा असे ठरविण्यात आले.

अनेक दलित नेत्यांना तो शब्द आवडत नाही. त्यात उपहास दडला आहे, अशी शंका त्यांना येते. अस्पृश्या ऐवजी 'दलित' शब्द विसाव्या शतकाच्या चौथ्या दशकात प्रचलनात आला. 'हरिजन' ऐवजी 'दलित' हा शब्द वापरावा असा सुशिक्षित आंबेडकरवादयांचा आग्रह आहे.

शतकानुशतके ज्यांना मानवी हक्कपासून वंचित ठेवण्यात आले त्यांना विकासासाठी विशेष संधी देणे आवश्यक आहे. व त्यासाठी त्यांचा सामुहिक उल्लेख करणे गरजेचे आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या निवेदनाची दखल घेवून तत्कालीन सरकारने १९३५ मध्ये भारत सरकारच्या कायद्यात 'अनुसूचित जाती' (शेडयुल्ड कास्ट्स) असा उल्लेख केला व सरकारी कामकाजात आणि हळूहळू

सार्वजनिक चर्चेतही तो रूढ झाला आहे. विशेष संधी ज्यांना द्यायची आहे. त्यांची यादी असा त्याचा अर्थ आहे. भारताच्या संविधानाच्या कलम ३४१ मध्ये तशीच तरतूद करण्यात आली आहे.

अस्पृश्यता व जातीभेद नष्ट करण्यासाठी सहभोजने व आंतरजातीय विवाह या कार्यक्रमांना प्रोत्साहन द्यावे असे विसाव्या शतकाच्या तिसऱ्या – चौथ्या दशकात काही जन मांडत होते. समतानंद अ ह गद्रे यांनी तर सहभोजनाची चळवळ सुरू केली होती. सुरूवातीला गांधीजींनी त्याला पाठींबा द्यायला नकार दिला होता. ज्यांना सामुहिक जीवन जगण्याऐवजी खाजगी कौटुबिक जीवन जगायचे आहे. त्यांच्यावर तशी सक्ती करू नये असे गांधीजीचे म्हणनने होते.

अस्पृश्यता निवारणाचा ठराव कॉंग्रेसने केल्यानंतर काही जणांनी गांधीजीना विचारले होते की त्यासाठी सहभोजने आणि आतंरजातीय विवाह करणे सक्तीचे मानले काय? त्याला त्यांनी नकारात्मक उत्तर दिले होते. 'हरिजन' च्या ता. ०१/०२/१९४२ च्या अंकात त्यांनी स्पष्टपणे म्हटले की, अस्पृश्यता निवारणात रोटी व बेटी व्यवहारावरील बंधने हटविणे अपरिहार्य नाही असे मागे म्हणाले होतो ते सर्वसाधारण हिंदूना अनुलक्षून होते. कॉंग्रेसचे कार्यकर्ते व सभासद यांनी मात्र आपल्या जीवनाच्या सर्व व्यवहारातून अस्पृश्यतेच्या त्याग केला पाहिजे.''

ईश्वराचा उपयोग ते अस्पृश्यता दृढ करण्यासाठी नव्हे तर ती नष्ट करण्यासाठी करू पाहत होते. जनसामान्यांना, सर्वसाधारण स्त्री–पुरूषंना प्रश्न समजायला मात्र त्यामुळे मदत होत असावी. ता. ०२ ऑगष्ट १९२४ रोजी बनारस येथे महिलांच्या सभेत बोलतांना गांधीनी म्हणाले, ''खाण्यापिण्यात वरिल निर्बंध आणि श्रेष्ठ कनिष्ठतेचा भाव जोपासने म्हणजे धर्म असे आज आपण मानू लागलो आहोत ही मोठी शोकांतिका आहे..... माणसाचे मोल त्याच्या जन्मावरून नव्हे तर चारित्र्यावरून ठरवायचे असते.... आपल्या देशबांधवांपैकी एकपंचामांश जणांना अस्पृश्य मानावे अशी शिकवण वा आज्ञा ईश्वर देणेच शक्य नाही, कारण ईश्वर म्हणजे रास्तपण ;तपहीजद्ध वा न्याय ;श्रनेजपबमद्ध होय. ;डींजउं च्य २८०.२८१द्ध पण अशाप्रकारच्या सामाजिक सुधारणा धर्म वा इश्वर यांच्या नावाने आवाहने करून स्थाई स्वरूपात होत नाहीत. असाच वास्तविक अनुभव आहे.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जातीभेद विषय विचार :**

'ॲनिहिलेशन ऑफ कास्ट' या प्रसिध्द ग्रंभाच्या निमित्ताने डॉ. बाबासाहेब आंबेडकर लिहितात, ''जातीभेद नष्ट करायचे असतील तर वेद, पुराणे व अन्य धर्मग्रंथ यांना नाकारले पाहिजे. माणसा – माणसांत भेदभाव करायला शिकविणे म्हणजे अनितीचे धडे देणे होय. स्त्री–पुरूष सर्व समान आहेत. सर्वांशी आपलेपणाने वागावे ही खरी निती होय. तिला छेद देणारी शिकवण जे धर्मग्रंथ सांगतात ते अनीती शिकवितात. जातीभेद पाळणे अयोग्य आहे. असे अनेक हिंदूना वाटू लागले आहे. पण वेद व तत्सम ग्रंथ (शास्त्रे) यावर आधारलेला धर्म सोडण्याशिवाय जातीभेदांचे निर्मूलन करणे शक्य नाही''. असे प्रतिपादन आंबेडकरांनी घाणाघाती भाषेत केले आहे. पुढे ते म्हणतात, ''शास्त्रांचे (म्हणजे धर्मग्रंथांचे) प्रमाणतत्व नष्ट करणे हाच खरा उपाय आहे. .. शास्त्रांच्या अधिकारास आव्हान न देता व त्यावर विश्वास ठेवायला व त्यांना पवित्र मानायला लोकांना परवानगी द्यायची, मात्र त्यांच्या वर्तनावर टिका करायची की ते अविवेकी व अमानवीय आहे. ही सामाजिक सुधारणा घडविण्याची चुकीची पध्दत आहे. अस्पृश्यता निवारणाचे कार्य करणाऱ्या म. गांधीसारख्या समाजसुधारकांच्या हे लक्षात येत नाही की लोकांचे (जातीभेदांचे पालन करणारे) वर्तत हे शास्त्रांनी त्यांच्या मनावर जे बिंबवले आहे. त्याचा परिणाम आहे..... त्यांचे वर्तन बदलायचे असेल तर ते ज्यावर आधारलेले आहे त्या धर्मग्रंथाचे पावित्र्य व प्रामाण्य मानू नका असे सांगायला हवे.'' (डॉ. बाबासाहेब आंबेडकर, रायटिंग्ज ॲण्ड स्पीचेस खंड – १ ला पृ. क्र. ६८)

असे करणे म्हणजे धर्म नष्ट करणे हाये असे म्हणावे लागेल, असे बाबासाहेब पुढे म्हणतात ''तत्व व त्यावर आधारलेले नियम यात फरक आहे. नुसते नियम बदला असे सांगणे पुरेसे नाही, तर

ते ज्यांच्यावर आधारलेले आहे ते तत्व ही सोडून द्या. वेद, शास्त्रे आदींमध्ये नियमच जास्त सांगितले असले तरी त्यांच्या मुळाशी तत्व आहेच व ते भेदाभेद करायला सांगणारे आहे. म्हणून तो धर्म नष्ट केला पाहिजे, असे बाबासाहेबांचे प्रतिवादन आहे. न्यायबुध्दीला न पटणारा धर्म सोडून द्यायला हवा. भूतकाळाचा गौरव करणारी मानसिकता बदला'' असे अतिशय मार्मिक आवाहन बाबासाहेबांनी तळमळिणे केले आहे.

**दुसरी गोलमेज परिषद व येरवडा करार (पुणे करार) :—**

दुसऱ्या गोलमेज परिषदेचे कामकाज सन १९३१ च्या सप्टेंबर ला सुरू झाले. अल्पसंख्याकांच्या प्रश्नांवरील समितीचे अध्यक्ष स्थान खुद्द पंतप्रधानांनी स्वीकारले होते. दलितांना अल्पसंख्याक जमात मानले जावे व लोकसंख्येच्या प्रमाणात त्यांना आपले प्रतिनिधी निवडून पाठवता यावेत असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडले. ''मी कुठल्या एका जमातीच्या वतीने नव्हे तर सर्व भारतीय जनतेच्या वतीने बोलतो आहे, ''प्रोढ मताधिकार दिला जावा, अल्पसंख्याकांना प्रतिनिधीत्व मिळावे, मात्र विभक्त मतदारसंघाची पध्दत अनिष्ठ असल्याने त्या ऐवजी समिश्र मतदार संघ व राखीव जागा अशी पध्दती अनुसरांवी'' असे मत गांधीजींनी मांडले. त्यावरही थोडा 'तिखट शब्द छल होवून अखेरीस बैठक आठवडयासाठी तहकूब झाली. ता. २८ सप्टेंबर ला पंतप्रधानांचे उत्तर आले. दलितासांठी विभक्त मतदार संघाबरोबरच त्यांना सर्व साधारण मतदारसंघातही मतदाराचा हक्क ठेवला असल्याने त्यांना हिंदू समाजापासून फोडले जात आहे हे गांधीजींचे म्हणणे चुकिचे आहे. असे त्यात म्हटले होते. १७ आगष्टच्या निवाडयात मी आता माझ्याकडून कुठलाही बदल करू शकत नाही असे त्यांनी स्पष्ट केले होते.

दलितांच्या विभक्त मतदारासंघास विरोध करण्यासाठी मा. गांधीनी ता. २० सप्टेंबर रोजी प्राणांतिक उपोषण सुरू करण्याचे ठरविले. सर्वपक्षीय सभा व डॉ. आंबेडकर यांच्याकडून ता. २५ सप्टेंबरला अनुकूल उत्तर आल्यानंतर ता. २६ सप्टेंबरला दुपारी गांधीजनी उपोषण सोडले. (पूना ॲक्ट, क्यो, क्या और किसके लिए, लेखक शीलप्रिय बौध्द पा.नं. १३०—१३१, सम्यक प्रकाशन, कानपूर)

सरकारी नोकऱ्यांत उचित प्रमाणात नेमणुका केल्या जाव्यात, प्रांतिक सरकांरांना मिळणाऱ्या अनुदानातून दलितांना सवलती दिल्या जाव्यात, आदी कारणासाठी येरवडा करारात अंतर्भाव करण्यात आला.

दलितांसाठीचे विभक्त मतदारसंघ अस्तित्वात येऊ नयेत यांसाठी गांधीजींनी प्राणांची बाजी लावली होती, या बदल डॉ. आंबेडकर व त्यांचे असंख्य अनुयायी अतिशय नाराज झाले होते. इतर जातीच्यासाठी तसे मतदारसंघ ठेवायला त्यांनी कडवा विरोध तर केला नाहीच, उलट संमती दिली. दलितांना एकाकी पाडण्यासाठी त्यांनी तसे केले असा अभिप्राय डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'कॉग्रेस व गांधीजीनी अस्पृश्यांसाठी काय केले?' या ग्रंथात व्यक्त केला आहे. दलितांचे प्रतिनिधी फक्त दलितांनीच निवडायचे असा आग्रह धरण्याचे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते कारण असे होते की, समिश्र मतदार संघातून तोच दलित उमेदवार निवडून येणार जो 'सवर्णाच्या हातचे बाहुले बनण्यास तयार असलेले व सर्वांना जो पसंत आहे.

**निस्कर्ष :—**

१) वर्णाश्रम समाज व्यवस्थेच्या संबधीत कोणताही कार्यक्रम आजमितीस शक्य नाही. ही समाज व्यवस्था असमानता, बेकारी, जातीप्रथा, अस्पृश्यता, उच्च—निचता, शोषण, एकाधिकारशाही, वर्णाधारित वर्चस्व या सारख्या दोषानी रोगग्रस्त झाली आहे. या रोगावर चातुवर्ण्यात कोणतीही ठोस उपाययोजना नाही.

२) भारतासारख्या जातीवर आधारित समाजव्यवस्थेत दारिद्रयांनी पिडीत असलेल्या दलित वर्गाच्या हिताचे संरक्षण चरखा व विकेंद्रीकरणाच्या धोरणाने होऊ शकत नाही. कारण आपल्या देशात सामाजिक

आर्थिक व शैक्षणिक न्याय विरोधी विचारधारा विविध रूपात सक्रिय आहे. भारतात केवळ शासनाची न्यायोचित भूमिकाच दलितांच्या हिताचे संरक्षण करण्यास सक्षम आहे.

३) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारानुसार, भारतीय समाजव्यवस्थेत दिनदलित वर्गाच्या आर्थिक परिस्थितीत चरखा, न्यास सिध्दांत, (विश्वस्थ सिध्दात) अयांत्रिकरण आणि विकेंद्रिकरणाद्वारे सुधारणा करणे अशक्यप्राय गोष्ट आहे. केवळ गोरगरिब, दारिद्री, दलितांचा आर्थिक विकास औद्योगिकरण, राष्ट्रीयकरण आणि शासणाच्या आर्थिक व्यवस्थपनानेच आर्थिक विकास व न्याय मिळणे शक्य आहे.

४) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या दृष्टीने वर्णाश्रम समाज व्यवस्था ही अशी एक कपोकल्पीत धारणा आहे, की ज्यात विद्यमान सामाजिक आणि आर्थिक परिसितीचे समाधान कारक उत्तर नाही, ठराविक धोरण नाही, ते धोरण राबविण्यासाठी आवश्यक साधन सामुग्री नाही. ही व्यवस्था भारतीय संविधानात अंतर्भूत समाजवादी समाजाच्या निर्मितीतील मुलभूत तत्वाच्या अगदी विरोधी संकल्पना आहे.

५) महात्मा गांधीजी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यांत विभक्त मतदार संघाबाबत झालेल्या समझोत्याचा दलित वर्गाच्या राजकीय जीवनाचा स्वातंत्र्याच्या ७० वर्षात अत्यंत वाईट अनुभव आलेला आहे दलित समाजात संवर्णाच्या प्रस्तापित राजकिय पुढाऱ्यांची जमचेगिरी करण्याची होड लागली आहे. निर्धारित आरक्षणा ऐवढे दलितातील लोक निवडून जातात. परंतू हे निवडून गेलेले दलित आमदार व खासदार आपआपल्या राजकिय पक्षाच्या विचारधारेच्या दबावाखाली आपल्या समाजाच्या विकासाचे कायदे करण्यास असमर्थ ठरले आहेत. स्वताचा व्यक्तिगत स्वार्थ साधण्यातच हे नेते मशगुल आहेत. याचा परिणाम दलितांच्या शैक्षणिक, आर्थिक, रोजगारविषयक व सामाजिक समस्या दिवसेदिवस भयानक रूप घेत आहेत.

**संदर्भ :–**

१) महात्मा गांधी आणि दलित : लेखक पन्नालाल सुराण, पृ. ३६–३८ पृ. ७८–८१
२) गांधीजी – पु.ल. देशपांडे
३) डॉ. आंबेडकर के आर्थिक विचार – ले. डी.आर. जाधव पृ. ३७–४४

# महात्मा गांधीचे शिक्षण विषयक विचार

**डॉ. पी.बी पगारे**
शिक्षणशास्त्र विभाग, औरंगाबाद

**सारांश-**
माहात्मा गांधीचे शैक्षणिक विचार याबाबत सदर लेखात चर्चा करण्यात आली. गांधींचे शैक्षणिक कार्य लक्षात घेता त्यांनी ६ ते १४ वर्षे वयोगटातील सर्व मुलांना मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण देण्यात यावे व प्राथमिक शिक्षण स्वयंपूर्ण व पायाभूत शिक्षण हे महत्वाचे असून ते नवीन पिढीत अहिंसाधिष्ठित मूल्यांची निर्मिती करण्यास उपयुक्त आहे. असे जीवनोपयोगी शिक्षण होते.ते स्वावलंबन व मातृभाषेतून शिक्षण देण्यात यावे तरच बालकाचा विकास होऊ शकतो अशी त्यांची धारणा होती. जीवनोपयोगी हस्तोद्योग नैतिक शारीरिक श्रम अध्यनन विषयांशी संलग्न करुन अन्नसाठी शारीरिक श्रमाचे महत्व यावर भर होता. त्यांनी शिक्षणात ३H म्हणजे Hand, Heart] Haad यांच्या विकासावर भर दिला. गांधीजींचे शैक्षणिक तत्वज्ञान म्हणजेच उद्योगशील आत्मान्नती, बुध्दीमत्ता यांचा समन्वय होता. शिक्षणातून जे उत्पादन होईल त्यातून शिक्षणाचा खर्च भरुन आहिंसेच्या तत्वाचा पुरस्कार करुन नैतिक गुणांच्या विकासाकडे, चारित्र्यसंवर्धनाकडे, नागरिकत्व शिक्षणाकडे या शिक्षणात लक्ष दिलेले आहे.या शिक्षणातून सुबुध्द, सदगुणी, चिकित्सक, जबाबदार,आत्मविश्वासू, स्वावलंबी नागरिक, निर्माण होईल भारताचा विकास होईल अशी अपेक्षा आहे. मं गांधी हे तत्वज्ञ व शिक्षणतज्ज्ञ होते. ते प्रयोगशील हेते. त्यांची जीवनाकडे पाहण्याची दृष्टी ही सर्वसमावेशक व सहिष्णु होती यावर त्यांची असीम श्रध्दा होती.

महात्मा गांधीचे शिक्षण विषयक विचार

आजच्या काळात माहात्मा गांधीचे शैक्षणिक विचार हे सर्व स्तरावर महत्व पूर्ण व मार्गदर्शक आसून त्यांनी मांडलेल्या शिक्षण मॉडेल याबाबत सदर शोधपत्रात चर्चा करण्यात आली आहे. यामध्ये गांधीजींची नई तालीम, अहिंसा, शिक्षणाचे ध्येय, निसर्गवाद आणि स्वावलंबन मांडण्यात आले आहे.

**गांधीजींची नई तालीम** -६ ते १४ वर्षे वयोगटातील सर्व मुलांना मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण देण्यात यावे व प्राथमिक शिक्षण स्वयंपूर्ण व पायाभूत शिक्षण हे महत्वाचे असून ते नवीन पिढीत अहिंसाधिष्ठित मूल्यांची निर्मिती करण्यास उपयुक्त आहे. असे त्यांचे मत होते. त्याला पायाभूत म्हणण्याचे कारण म्हणजे ते जीवनोपयोगी होते. स्वावलंबन हे मातृभाषेतून शिक्षण देण्यात येईल. जीवनोपयोगी हस्तोद्योग नैतिक शारीरिक श्रम अध्ययन विषयांशी संलग्न करुन अन्नसाठी शारीरिक श्रमाचे महत्व यावर भर होता शिक्षणातून जे उत्पादन होईल त्यातून शिक्षणाचा खर्च भरुन निघू शकेल. गांधीजी म्हणाले, my nai-talim is not dependent on money. The running expenses of this education should come from the eduscational process itself. Whatever the criticism may be I know that the only education is that which is self-supporting गांधीजींचे शिक्षणात ३H म्हणजे Hand, Heart] Haad यांच्या विकासावर भर दिला. गांधीजींचे शैक्षणिक तत्वज्ञान म्हणजेच उद्योगशील आत्मान्नती, बुध्दीमत्ता यांचा समन्वय होता. लॉर्ड बॉयड आर. यांच्या मते गांधीजींनी प्रतिपादित केलेले सिद्धांत आज जागतिक स्तरावर व्यवहारात आणण्याची वेळ आलेली आहे. जगाला हे विचार निश्चितपणे अंमलात आणावे लागतील. कारण याशिवाय शक्य आहे तो फक्त विनाश युध्द आणि संघर्ष यांच्य त्रासापासून आंतरराष्ट्रीय राजकारणाला वाचविण्याचा हा एकमात्र उपाय आहे. म्हणूनच जागतिक स्तरावर २ ऑक्टोबर हा दिवस जागतिक अहिंसा दिन म्हणून साजरा करण्यात येत आहे.

मैकियावेली या पाश्चिमात्य राजकीय विचारावंताने सांगितलेल्या विचाराने जगाचा उद्धार कधीच होऊ शकत नाही. जगाला आहिंसेचा विचारच पुढे नेऊ शकतो. स्वीडनचे प्रसिध्द अर्थशास्त्रज्ञ गुन्नार मिदझिंव्ल म्हणतात. भारताच्या आर्थिक विकासाचा एकमात्र मार्ग गांधीवाद आहे. बेकारीच्या समस्येवर उपाय गांधींनी सांगितलेला कुटीरोद्योग, सूतकताई हा आहे. मं गांधी हे तत्वज्ञ व शिक्षणतज्ज्ञ होते. ते प्रयोगशील हेते. त्यांची जीवनाकडे पाहण्याची दृष्टी ही सर्वसमावेशक व सहिष्णु होती यावर त्यांची असीम श्रध्दा होती.

**अहिंसेचे पुजारी-** ते अहिंसेचे उपासक होते. त्यांच्या मते अहिंसा म्हणजे प्रेम. अहिंसा म्हणजे हिंसेचा अभाव नव्हे. अहिंसा हा सत्यशोधनाचा, सत्यप्राप्तीचा मार्ग आहे. अहिंसा म्हणजे हिंसा, व्देष, क्रोध, दांभिकपणा यांच्यपासून मुक्तता. पर्यायाने अहिंसेमध्ये नम्रता, धैर्य, अंतःकरणीची शुध्दता, धार्मिकता, सहिष्णुता इत्यादी महात्मागांधीवर गौतमबुध्दाच्या आहिसा, सत्य ताचाच पगडा होता. ते अहिंसा म्हणजे आत्माचे सामर्थ्य असे म्हणता अहिंसा हे शुरांचे लक्षण आहे. पण आवश्यक परिस्थितीत हिंसा करावी लागल्यास त्याला विरोध गांधीजीचा नव्हता.अस्तेय म्हणजे चोरी न करणे आवश्यकता नसताना एखाद्या गोष्टी प्राप्त करण्याचे इच्छा म्हणजे की गुणांचा अंतर्भाव होतो. त्यांनी अहिंसेचा मार्ग पत्करला. करण तो सत्याची कस धरणारा, पाशवी शक्तीवर नैतिकतेला विजय प्राप्त करुन देणारा आहे

**सत्याग्रह** - मानवाने सत्याचा आग्रह धरला पाहिजे. सत्याग्रह म्हणजे अहिंसा तत्वाचे प्रत्यक्ष व्यवहारी स्वरुप. दुस-याला कोणत्याही प्रकारचा ताप न देता स्वतःला यातना व कष्ट देऊन सत्यप्राप्ती करण्याचा मार्ग. सत्याग्रहाच्या मार्गानेच शांततेचे संरक्षण होते.

- म. गांधी निसर्गवादी आदर्शवादी व कार्यवादी होते. त्यांचा या जीवनविषयक तत्वज्ञानाची छाप आपणास त्यांच्य शिक्षणविषयक तत्वज्ञानात पहावयास सापडते.

- शिक्षण म्हणजे साक्षरता नव्हे. साक्षरत म्हणजे शिक्षणाचा प्रारंभ नव्हे वा शेवटही नव्हे. ते शिक्षणाचे साधन आहे. शिक्षण म्हणजे विकास. व्यक्तीचा सर्वांगीण विकास मुलांमध्ये सुप्तावस्थेत असलेल्या उत्कृष्टतेचा विकास,शारीरिक, मानसिक व आध्यात्मिक विकास, मानवाचा समतोल सर्वांगीण, सुसंवादी विकास म्हणजे शिक्षण.

- म.गांधी निसर्गवादी होते. त्यांच्या मते मूल हे स्वभावतःच चांगले असते. त्याला स्वातंत्र्य दिले पाहिजे. त्याचा विकास निसर्गनियमानुसार निसर्गाच्य सान्निध्यात झाला पाहिजे असे ते आग्रहाने प्रतिपादन करीत. मूल हे त्यांच्या जीवनाचे केंद्र होते. मुलांवर त्यांचे अमर्यादा प्रेम होते व त्याचा समतोल विकास प्रेम,जिव्हाळा व आत्मीयता यांच्या सहाय्यानेच होईल अशी त्यांची श्रध्दा होती.

- आदर्शवादी विचारसरणीच्य प्रभावाने अध्यात्मिक पूर्णता व आध्यात्मिक साक्षात्कारावर त्यांनी भर दिला. मुलाचा सर्वांगीण विकास-शारीरिक, मानसिक,व आध्यात्मिक झाला पाहिजे असे त्यांचे मत होते. जगातील प्रत्येक वस्तुमात्रात-विशेषतःमानवात-परमेश्वरी अविष्कार आहे. त्यांच्या सर्वोदय समाजाचा उगम त्यांच्य आदर्शवादी तत्वज्ञानात आहे. ते केवळ तात्विक आदर्शवादी नव्हते तर आदर्शवादी नव्हते तर आदर्शवाद व्यवहारात आणण्यासाठी त्यांनी कार्यवादाचा पुरस्कार केला. शिक्षणात त्यांनी कार्यवादी तत्वज्ञानाची कास धरलेली आढळते. पाश्चात्य शिक्षणशास्त्रज्ञ जॉन ड्युई यांच्य विचारांशी त्यांच्य विचारांचे बरेच साम्य आढळते. या सर्वांचा विचार आपण पुढे स्वतंत्रपणे करणार आहोत. सारांश, जीवनाकडे पाहण्याची त्यांची श्रध्दा होती.

१. शिक्षणाचे ध्येय- दक्षिण आफ्रिकेतील टॉलस्टॉय आश्रम व फिनिक्स वसाहतीत शिक्षणाचे प्रयोग करणा-या महात्मागांधीनी भारतात आल्यानंतर मुलोद्योगी शिक्षणाच्या अभिनव प्रयोगान शिक्षण क्षेत्राला एक नवी दिशा दिली. म. गांधीच्या मते शिक्षणाची ध्येये दोन प्रकारची आहेत. ती अशी- तत्कालिक व दूरगामी अंतिम दैनंदिन जीवनाच्या गरजापूर्ती करणारी ध्येये ही तत्कालीक ध्येय होत तर ती साध्य झाल्यानंतर मानवी जीवनाच्या अंतिम उद्दिष्टांचा विचार करणारी ध्येये ही दीर्घकालीन किंवा अंतिम ध्येये होत.

१. अ. तत्कालिक ध्येये- उदरनिर्वाहासाठी शिक्षण देणे, सांस्कृतिक शिक्षण देणे, चारित्र्य निर्मिती
मुलाचा सर्वांगीण विकास
ब. अंतिम ध्येय- आत्मविकास आणि व्यक्ती व समाज यांची ध्येय एकमेकात पूरक

२. आत्मविकास- संपूर्ण विकसित व्यक्तिनिर्मिती एवढेच शिक्षणाचे उद्दिष्ट न राहता अशा विकसित सर्व क्षमतांचा समाजासाठी उपयोग करण्याची, प्रेरणा व्यक्तीला देणे हेही शिक्षणाचे ध्येय असले पाहिजे. व्यक्तीचे व्यक्तिमत्व मर्यादित न राहता अंती ते अनंतात विलीन झाले पाहिजे. व्यक्ति व समाज यांची ध्येये एकमेकास पूरक असली - त्यात समायोजन व सुसंवाद हवा. व्यक्ती राष्ट्राशिवाय, समाजाशिवाय, प्रगती करु शकत नाही तर प्रगत सुविकसित व्यक्तीखेरीज समाजाची वा राष्ट्राची प्रगती होऊ शकत नाही असे म. गांधीचे मत होते. सामाजिक गरजांची जाणीव ठेवून त्या पूर्ण करणा-या प्रयत्नांखेरीज व्यक्तीला आत्मसाक्षात्कार होऊच शकत नाही.

३. मूलभूत व्यवसायाचे शिक्षण देणे- कृषी, सूतकताई व कापड विणणे,सुतारकाम,पुठ्ठरकरम,बागकाम, धातुकाम,चर्मकाम इ. इ. व्यवसायांचे स्थानिक गरजांनुसार शिक्षण देणे.

मातृभाषांचे अध्ययन करणे- मातृभाषा हे शिक्षणाचे माध्यम झाले पाहिजे असे त्यांचे मत होते. ती आविष्काराचे प्रभावी साधन आहे.
अंकगणिताचा अभ्यास- दैनंदिन व्यावहारिक जीवनोपयोगी असे स्वरुप या विषयाचे हवे
समाजशास्त्राचा अभ्यास- इतिहास,भूगोल,नागरिकशास्त्र, प्रचलित घटना यांतून वैयत्कि व सामाजिक गुणांचा विकास व्हावयास हवा.
भौतिकशास्त्राचा अभ्यास- भौतिकशास्त्राचा ,प्राणिशास्त्र, शरीरशास्त्र, रसायनशास्त्र, वनस्पतीशास्त्र,खगोलशास्त्र यांचा अभ्यास करणे आवश्यक आहे. त्यामुळे बुध्दी प्रगल्म होते व वैज्ञानिक दृष्टी प्राप्त होते.
ललितकलांचा अभ्यास- संगीत,चित्रकला यांचा शिक्षणात अंतर्भाव करणे.

४. अध्यापन पध्दती- व्यवसायकेंद्री अध्यापन- Learning by doing या सुत्राचा उपयोग कटक्षाने केला पाहिजे. शाळेतील बहुतेक सर्व विषय हे समवाय पध्दतीने शिकविणे संयुक्तिक आहे. त्यामुळे विविध विषय हे भिन्न नाहीत ते एकाच ज्ञानाचे विविध अविष्कार आहेत ही भावना दृढमूल होते व विविध विषयांचे अध्यापन व पर्यायाने अध्ययनही प्रभावपूर्ण होते. या शिक्षण योजनेची मूलतत्वे व वैशिष्टये पाहणे क्रमप्राप्त आहे.

५. लोकशाहीला आत्यावश्यक व पोंषक असे किमान शिक्षण ७+ते १४+ या वयोगटातील विद्यार्थ्यांना देणे आवश्यक आहे.
६. व्यवसाय केंद्रित शिक्षण-व्यवयास हा शिक्षणाचा केंद्रबिंदू आहे. शाळातील विविध विषय इतिहास, भूगोल, गणित,शास्त्र, भाषा, संगीत,चित्रकला यांच्या व्यवसायाशी समन्वय साधला पाहिजे.
७. स्वावलंबन व श्रमप्रतिष्ठा या तत्वांवर हे शिक्षण अधिष्ठित आहे.
८. व्यक्तीमत्वविकास या शिक्षणातून साधता येईल . हे शिक्षण व्यवसायकेंद्री असले तरी त्याला वैचारिक व आध्यात्मिक बैठक आहे. आहिंसेच्या तत्वाचा पुरस्कार करुन नैतिक गुणांच्या विकासाकडे, चारित्र्यसंवर्धनाकडे, नागरिकत्व शिक्षणाकडे या शिक्षणात लक्ष दिलेले आहे.या शिक्षणातून सुबुध्द, सदगुणी, चिकित्सक, जबाबदार,आत्मविश्वासू, स्वावलंबी नागरिक, निर्माण होईल भारताचा विकास होईल अशी अपेक्षा आहे.

**स्वावलंबन-** शांतिनिकेतनमध्ये विद्यार्थी आणि शिक्षक यांच्या समावेत चर्चा करताना अंगमेहनती विषय म्हणताना ते म्हणतात पगारी आचा-या ऐवजी शिक्षक आणि विद्यार्थीच स्वत:च स्वयंपाक करुन घेतील तर चांगले होईल. आरोग्याच्या व नीतीच्या दृष्टीने शिक्षक भोजनगृहाचे नियमन करु शकतील व विद्यार्थीनाही स्वावलंबनाचा व स्वयंपाकाचा वस्तूपाठ मिळेल ही गोष्ट शिक्षकापुढे मांडली. त्याचा हा प्रयोग सर्वांना आवडला. यातून विदयार्थ्याना स्ववलंबनाची व स्वराज्याची गुरुकिल्ली दिली.

**आत्मिक शिक्षण-** आत्म्याचा विकास करणे म्हणजे शील बनविणे आत्मज्ञान प्राप्त करुन देणे होय मुलाना फक्त पुस्तकामार्फत शिक्षण देऊन चालणार नाही. शारीरिक शिक्षण शरीराच्या कसरतीसाठी देता येते. बौध्दिक शिक्षण बुध्दिच्या कसरतीसाठी त्याच प्रमाणे आत्मिक शिक्षण सुध्दा आत्माच्या कसरतीसाठी देता येणार. आत्माची कसरत शिक्षकाच्या वर्तनानेच प्राप्त होणार म्हणून युवक पाहात असोत किंवा नसोत सदा सर्वदा शिक्षकाने सतर्क राहिले पाहिजे. जर मी खोटे बोलत गेलो आणि स्वत:च्या शिष्यांना मात्र सच्चे बनविण्याचा प्रयत्न केला तर ते व्यर्थच जायचे भित्रा शिक्षक शिष्यांना शौर्य शिकवू शकणार नाही ? व्यभिचारी शिक्षक शिष्याना संयम कसा शिकविणार ? मी मनाशी ठरविणे की, मी माझ्यापाशी असलेल्या तरुण मुला व मुलीना वस्तुपाठरुप होऊन राहिले पाहिजे शिक्षकाच्या वर्तनाच्या शिष्याच्या वर्तनावर आत्मिक विकास होण्याकरिता मोठा परिणाम होत असतो या करिता शिक्षक आदर्श असायला हवा त्याच्या कृतीच्या परिणाम विद्यार्थ्याच्या अनुकरणात महत्वाची भूमिका बजावीत असतात.

संदर्भ-

१. पटवर्धन सी.पी.(१९६५) सत्याचे प्रयोग अथवा आत्मकथा मौ.क.गांधी. अहमदाबाद. नवजीवन प्रकाशन
२. पवार ना.ग.(२००७) भारतातील शिक्षण पध्दतीचा विकास पुणे : नित्यनूतन प्रकाशन
३. वीरकर प्र आणि वीरकट प्र. (२००८) उदयोन्मुख भारतीय समाजाचे शिक्षण व शिक्षक पुणे : पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन
४. दुनाखे अ. (२००४) भारतीय शिक्षण पध्दती व माध्यमिक शिक्षण पुणे :नूतन प्रकाशन
५. Mani R.V.S.(२००८) educational deas of Gandhi and tagore

# महात्मा गाँधी कि सामाजिक न्याय की अवधारणा

**नेमीचन्द पालीवाल**
शोधार्थी
राजनीति विज्ञान विभाग
राजस्थान विश्वविद्यालय, जयपुर

वर्तमान परिपेक्ष्य में महात्मा गाँधी के विचार व आदर्श प्रेरणा के स्त्रोत है। विश्व के विभिन्न क्षेत्रों में मानवाधिकारों की रक्षा के आन्दोलन में गाँधी का जीवन और संघर्ष एक महान प्रेरणा है। दक्षिण अफ्रीका में नेल्सन मंडेला, अमेरिका के पूर्व राष्ट्रपति बराक ओबामा तथा म्यांमार में 21 साल तक बन्दी रहनें के बाद मुक्त हुई आंग सांग सू की इन सभी ने महात्मा गाँधी को अपना आदर्श माना हैं।[1]

महात्मा गाँधी, अर्थात् मोहनदास करमचन्द गाँधी का जन्म 2, अक्टूबर,1869 को आधुनिक गुजरात प्रान्त के काठियावाड़ इलाके में पोरबन्दर नामक स्थान में हुआ था। उनके पिता करमचन्द उत्तमचन्द गाँधी ने तत्कालीन पोरबन्दर, राजकोट तथा वांकानेर की देशी रियासतों मे दीवान के पद पर कार्य किया था। वे अपनी कर्त्तव्य निष्ठा, सदाचारिता एवं सदाशयता के लिए प्रसिद्ध थे। गाँधी जी की माँ पुतली बाई अत्यन्त धार्मिक स्वभाव की थीं। गाँधी जी का परिवार वर्ण व जाति से वैश्य तथा धर्म से जैन था, किन्तु उनकी माँ वैष्णव धर्म में भी आस्था रखती थीं।

गाँधी जी की प्रारम्भिक स्कूली शिक्षा पोरबन्दर में तथा शेष स्कूली शिक्षा राजकोट में हुई। तत्कालीन परम्परानुसार मात्र 13 वर्ष की आयु में गाँधी जी का विवाह हो गया। उनकी पत्नी का नाम कस्तूर बाई था, जिन्हें बाद में कस्तुर बा अथवा मात्र 'बा' (माँ) के नाम से प्रसिद्धि प्राप्त हुई। 1887 में गाँधी जी ने दसवीं कक्षा पास की और 1888 मे कानून की पढ़ाई करने इंग्लैण्ड़ गये, किन्तु गाँधी जी को इंग्लैण्ड़ जाने की इजाजत उनकी माँ पुतली बाई ने तब ही दी जब गाँधी जी ने इंग्लैण्ड़ प्रवास के दौरान इन तीन मर्यादाओं के पालन की प्रतिज्ञा की वे मदिरा पान, माँस–भक्षण तथा पर–स्त्री–प्रसंग से सर्वदा दूर रहेंगे। गाँधी जी ने इन प्रतिज्ञाओं का पूर्णतः पालन भी किया।

जून 1891 में बेरिस्टर ( वकालत ) की परीक्षा में सफलता पाने के बाद गाँधी जी भारत लौटे और उन्होने बम्बई व काठियावाड़ के हाइकोंटो में वकालत की; वकील सुलभ गुणों के अभाव में उन्हें वकालत के पेशे में असफलता का सामना करना पड़ा। तब ही उन्हें 'दादा अब्दुल्ला एण्ड कम्पनी' की ओर से दक्षिण अफ्रीका में एक मुकदमें की पैरवी का प्रस्ताव मिला, जिसे गाँधी जी ने सहर्ष स्वीकारा। यद्यपि गाँधी जी मात्र इस व्यावसायिक कार्य से थोड़े समय के लिए ही दक्षिण अफ्रीका गये थे, किन्तु परिस्थितियाँ ऐसी बन गयीं कि उन्हें वहाँ एक लम्बी अवधि (1839–1914) तक रहना पड़ा।

दक्षिण अफ्रीका प्रवास की गाँधी जी के सार्वजनिक जीवन में अहम् भूमिका है। उन्होंने गोरी सरकार की नस्लीय भेद–भाव एवं अन्याय की कुनीति के प्रसंग में सत्य एवं अहिंसा पर आधारित ऐसी विरोध की नैतिक नीति अपनायी, जिसे बाद में उन्होने 'सत्याग्रह' का नाम दिया।

1914 में गाँधी जी दक्षिण अफ्रीका से 'एक महान भारतीय विजेता' के रूप में स्वदेश लौटे, किन्तु कांग्रेस एवं भारतीय राजनीति में उनके प्रभा–मण्डल की शुरूआत तब ही हुई, जब वे स्थानीय मुद्दों पर आधारित अग्रलिखित तीन सत्याग्रहों का सफल संचालन कर सके – चम्पारन आन्दोलन (1917), अहमदाबाद आन्दोलन (1918) तथा खेड़ा आन्दोलन (1918) ।[2]

वर्ष 1915 में गाँधी जी दक्षिणी अफ्रीका से भारत आए तब गाँधी जी ने भारत में दो प्रकार की व्यवस्था देखी। प्रथम प्रकार की व्यवस्था में अंग्रेजों ने भारत को पराधीन बना कर भारत का शोषण किया जब कि दुसरी व्यवस्था में भारत के लोगों को आपस में ही एक–दुसरें को ऊंच–नीच के रूप में विभाजित कर रखा था। धार्मिक आडम्बर, सामाजिक असमानता, पाखण्ड़ों से ग्रस्त था। ऐसे वातावरण में अंग्रजों को देश से बाहर निकालना प्रथम चुनौती थी तो दुसरी ओर भारत को भारत से आजादी दिलाना दुसरी चुनौती थी। इसलिए गाँधी जी ने दोनों चुनौतियों पर काम करना प्रारम्भ कर दिया। [3]

गाँधी जी ने वर्ष 1917 में चम्पारन, 1918 में खेडा, अहमदाबाद में सत्याग्रह कर अंग्रजों के विरूद्ध स्वतंत्रता की आवाज को बुलन्द किया। गाँधी जी का 1920 असहयोग आन्दोलन, 1930 सविनय अवज्ञा आन्दोलन तथा 1942 का भारत छोड़ो आन्दोलन भारतीयों को जागृत करने वाला था। इन सभी आन्दोलनों ने भारतीय समाज को जागृत किया और स्वतन्त्रता व समानता के संघर्ष के लिए तैयार किया।

असहयोग आन्दोलन में पहली बार जन समुदाय देखनें को मिला, इस आन्दोलनो में स्वतन्त्रता के लिए सभी वर्ग समुदाय आगे आया। युवकों, महिलाओं, किसानों व व्यापारियों ने सभी ने पहली बार अंग्रेजों के विरूद्ध आन्दोलन में भाग लिया। यह आन्दोलन अब आन्दोलन नही रहा बल्कि यह आन्दोलन अब जन सामान्य का आन्दोलन बन गया था।

सविनय अवज्ञा आन्दोलन भी भारतीय इतिहास में महत्वपूर्ण आन्दोलन रहा है, यह गाँधी जी असहयोग आन्दोलन से प्रबल, व्यापक व प्रचण्ड़ आन्दोलन था। इस आन्दोलन में महिलाओं, ग्रामीणों और पूंजीपतियों ज्यादा संख्या में भाग लिया। इस आन्दोलन का उद्देश्य राजनीतिक स्वतन्त्रता के साथ–साथ समानता को भी आदर्श माना।

सविनय आन्दोलन के बाद गाँधी जी ने रचनात्मक कार्यक्रमों में विशेष रूची दिखायी। गाँधी जी कि रचनात्मक गतिविधियों में महिला शिक्षा को बढ़ावा देना, शराब बन्दी, अस्पृश्यता का अन्त आदि सामाजिक बुराइयों को दुर करनें का विचार दिया। गाँधी जी ने राजनितिक क्षेत्र के साथ–साथ समाज सुधार के क्षेत्र में विशेष भुमिका का निर्वाह किया। गाँधी जी का विचार था कि जीवन एक सम्पूर्ण इकाई है और हम इसे सामाजिक, राजनीतिक, धार्मिक, आर्थिक भागों मे नही बाँट सकते है। इसलिए गाँधी जी ने माना कि समाज सुधार का कार्यक्रम भी राष्ट्रीय आत्मशुद्धि की प्रक्रिया है और इसके लिए सामाजिक कुरीतियों को दुर करना नितान्त आवश्यक है। इसी कारण गाँधी जी ने स्वराज्य आन्दोलन के साथ–साथ सामाजिक जीवन के लिए रचनात्मक कार्यक्रम को अपनाया। रचनात्मक कार्यक्रमों में प्रथम कार्यक्रम अस्पृश्यता का अन्त था। गाँधी जी अस्पृश्यता को भारतीय समाज के लिए कंलक मानते थे। उनका मानना था कि यह एक ऐसा घातक रोग है, जो समस्त समाज को नष्ट कर देगा। वे अछुतों को समान राजनीतिक, सामाजिक, आर्थिक अधिकार दिलानें के पक्ष में थे, उनके द्वारा सबसें अधिक जोर इस बात पर दिया गया कि अछूतों को भी स्वर्ण हिन्दुओं के समान मन्दिर प्रवेश और पूजा अराधना का अधिकार मिलना चाहिए। अछूतों में आत्म सम्मान की भावना जाग्रत होगी। गाँधी जी ने अर्न्तजातिय विवाह सम्बन्ध व गोद लेने पर जोर दिया।[4]

